रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १७५
www.ramprahar.com

शुक्रवार, १० जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

भाजप नेते किरीट सोमय्यांनी घेतली गवळी कुटुंबाची भेट/२
'वीर घाडगे यांचा इतिहास भावी पिढीपर्यंत पोहचवा'/५
पेणच्या बॉक्सर्सचा विभागीय स्पर्धेत डंका/८

## सागरी किल्ले, बेटांवर २६ जानेवारीला होणार ध्वजारोहण



**अलिबाग** : कोकण किनारपट्टीवरील सागरी किल्ले आणि निर्मनुष्य बेटे अशा ६२ ठिकाणी येत्या २६ जानेवारीला ध्वजारोहण होणार आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या निर्देशानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. यात रायगड जिल्ह्यात १० ठिकाणांचा समावेश आहे. खांदेरी, उंदेरी, कुलाबा, सर्जेकोट, जंजिरा, पद्मदुर्ग, कोर्लई या किल्ल्यांवर प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण होणार आहे. याशिवाय श्रीवर्धनमधील शेखाडी खडक, कासा खडक, गल या निर्मनुष्य बेटावरही ध्वजारोहण होईल. सागरी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बेटांवर वेळोवेळी भेटी देऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेण्यात यावा आणि वर्षातून किमान दोन वेळा त्या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात यावे, असे निर्देश केंद्रीय गृह मंत्रालयाने दिले आहेत. त्यानुसार आता २६ जानेवारीला या सर्व ठिकाणी ध्वजारोहण करण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे.

# पनवेलमध्ये आजपासून राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या अकराव्या स्पर्धेची महाअंतिम फेरी १०, ११ आणि १२ जानेवारी रोजी पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार तसेच ज्येष्ठ रंगकर्मी सतीश पुळेकर यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार असून प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या उत्कृष्ट २५ एकांकिका या तीन दिवसांच्या महाअंतिम फेरीत




सादर होणार आहेत.

महाअंतिम फेरीचे उद्घाटन शुक्रवारी (दि. १०) सकाळी ९ वाजता होणार आहे. या समारंभास श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत,

### एकूण २५ उत्कृष्ट एकांकिका होणार सादर; मान्यवरांची लाभणार उपस्थिती

भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष राजेश्री वावेकर यांची प्रमुख मान्यवर म्हणून; तर सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, प्राथमिक फेरीचे परीक्षक मानसी मराठे व आशीर्वाद मराठे यांची आदरणीय उपस्थिती असणार आहे.

पारितोषिक वितरण सोहळा रविवारी (दि. १२) सायंकाळी ७ वाजता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या वेळी सन्मानमूर्ती ज्येष्ठ रंगकर्मी सतीश पुळेकर, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची सन्माननीय; तर सुप्रसिद्ध अभिनेत्री सुकन्या मोने, सुप्रसिद्ध दिग्दर्शक देवेंद्र पेम, विराजस कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेता जयवंत वाडकर, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक ब्रँड अँम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेत्री रूचिरा जाधव, सुप्रसिद्ध अभिनेता भरत सावले यांची आदरणीय उपस्थिती असणार आहे.

महाअंतिम फेरीच्या अनुषंगाने नाट्य एकांकिकांचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील आणि टीम अटल करंडक यांनी केले आहे.

# ड्रोन प्रणालीमुळे सागरी सुरक्षा होणार भक्कम

## मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांचे प्रतिपादन





**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सागरी क्षेत्रात होणारी अवैध मासेमारी तसेच घुसखोरी रोखण्यासाठी ड्रोनद्वारे देखरेख विशेष प्रणाली सुरू करण्यात आली आहे. यामुळे सात जिल्ह्यातील नऊ सागर किनाऱ्यांची सुरक्षा आणखी मजबूत होणार असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी गुरुवारी (दि. ९) सांगितले.

मत्स्य आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मंत्री राणे यांच्या हस्ते ड्रोन देखरेख प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. समुद्रकिनारा लाभलेल्या राज्यापैकी ड्रोनद्वारे देखरेख प्रणाली विकसित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

पालघर जिल्ह्यातील शिरगाव, ठाणे जिल्ह्यातील उत्तन, मुंबई उपनगर जिल्ह्यातील गोराई, मुंबई शहर जिल्ह्यामधील ससून गोदी, रायगड जिल्ह्यातील रेवदंडा व श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा व साखरी नाटे, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड या नऊ समुद्रकिनाऱ्यावरून नऊ ड्रोन उडवले गेली. या वेळी ड्रोनद्वारे देखरेख प्रणालीचे प्रात्यक्षिक झाले. यासाठी मत्स्य आयुक्त कार्यालय येथे कंट्रोल रूम उभारण्यात आला आहे.

या कार्यक्रमास आमदार मनीषा कायंदे, कृषी व पदुम विभागाचे सचिव रामास्वामी एन, मत्स्यव्यवसाय आयुक्त पंकज कुमार, सागरी सुरक्षा पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, मत्स्यव्यवसाय उपायुक्त दिपाली बनकर यांच्यासह सात ठिकाणी उपस्थित असलेले मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

दरम्यान, अलिबागजवळील वरसोली बीच येथे रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते ड्रोन प्रणालीला हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करण्यात आले. त्याचबरोबर श्रीवर्धन तालुक्यातील मूळगाव जेट्टीवरूनही ड्रोन प्रणालीचे उड्डाण झाले. या ठिकाणी उपविभागीय अधिकारी महेश पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे, पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे, सहायक परवाना अधिकारी अक्षय साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती.



# ५० टक्के सवलतीच्या दरात एलईडी टीव्ही व रेंजर सायकल

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, सुहास भगत, सुदर्शन घरत व संदीप म्हात्रे यांच्या संयोजनातून नागरिकांना ८ ते २५ जानेवारीपर्यंत स्मार्ट एलईडी टीव्ही आणि रेंजर सायकल ५० टक्के सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे. या उपक्रमाचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उलवे नोड येथे शुभारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमास भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, रतन भगत, वामन म्हात्रे, हेमंत ठाकूर, अंकुश ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, निलेश खारकर, रमेश घरत, भाऊशेठ भोईर, मदन पाटील, सुधीर ठाकूर, किशोर पाटील, व्ही.के. ठाकूर, सी.एल. ठाकूर, मीनाक्षी पाटील, योगिता भगत, सुजाता पाटील, राजेंद्र देशमुख, रवींद्र भोईर, नवनाथ जाधव, सागरकुमार रंधवे, श्रीधर मोकल, राम मोकल, अनिल गमरे, अरविंद काटकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उलवे नोड सेक्टर १७मधील भारतीय जनता पक्ष कार्यालयात ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून त्यासाठी आधारकार्ड आणि रेशनकार्ड अनिवार्य आहे. **(पान २ वर..)**

# टीआयए इंडस्ट्रियल एक्सपोला आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट

## उत्पादनांची पाहणी; उपक्रमाला शुभेच्छा




**तळोजा : रामप्रहर वृत्त**

तळोजा इंडस्ट्रियल असोसिएशन (टीआयए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इंडस्ट्रियल एक्सपो २०२५ला पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि. ९) भेट दिली. त्यांनी उद्योजक व उद्योगांचे भवितव्य उज्वल ठरो, अशा शुभेच्छा दिल्या.

या वेळी टीआयए अध्यक्ष सतीश शेट्टी, भाजप कामगार मोर्चाचे उपाध्यक्ष अनिल खोपटे, सचिव संजय भगत यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

तळोजा इंडस्ट्रियल एरियामध्ये बनणारी विविध उत्पादने पाहून आपल्या परिसरातील औद्योगिक वसाहती जागतिक दर्जाची उत्पादने बनवत आहेत याचा अभिमान वाटला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मेक इन इंडिया हे प्रत्यक्षरीत्या साकार होत आहे आणि त्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची साथ लाभत आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

## 'मविआ'ला धक्का; राज्यपालनियुक्त आमदारांबाबतची याचिका फेटाळली

**मुंबई** : राज्यपाल नामनिर्देशित विधान परिषदेच्या १२ आमदारांबाबत महायुती सरकारला आव्हान देणारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना महाविकास आघाडी सरकारने १२ जणांच्या नावांची यादी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना पाठवली होती. नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार स्थापन झाले. महायुतीने राज्यपालांकडे प्रलंबित असलेली यादी मागे घेतल्यानंतर शिवसेना उबाठाचे नेते सुनील मोदी यांनी याचिका दाखल केली होती.

## सुवर्णदुर्ग किल्ल्याला मिळणार 'वर्ल्ड हेरिटेज साईट'चा दर्जा

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

दापोली तालुक्यात असलेला व राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून ओळखला जाणाऱ्या सुवर्णदुर्ग किल्ल्याला वर्ल्ड हेरिटेज साईटचा दर्जा देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाकडून हालचालींना वेग आला आहे.



संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संस्था (युनेस्कोने) या जलदुर्गाची पाहणी केली होती. त्यानुसार लागणाऱ्या सोयीसुविधा, बेकायदेशीर बांधकामे हटवणे, पाणी, शौचालय, पार्किंग आदी गोष्टींचे नियोजन करण्यासाठी जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांच्या नेतृत्वाखाली विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली. या सुविधा पूर्ण झाल्यास सुवर्णदुर्ग किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक पातळीवर जाईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

केंद्र सरकारने या किल्ल्याला महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. या किल्ल्याला वर्ल्ड हेरिटेज साईट दर्जा देण्याच्या दृष्टीने युनेस्को संस्थेने नुकतीच किल्ल्याची पाहणी करून काही सुधारणा आणि सुविधा सुचवल्या होत्या.

## आता महाराष्ट्रातही धावणार वंदे भारत स्लीपर एक्स्प्रेस



**नागपूर : प्रतिनिधी**

रेल्वे मंत्रालयाने सुरू केलेल्या वंदे भारत एक्स्प्रेसला चांगला प्रतिसाद मिळत असून आता लांब पल्ल्याच्या वंदे भारत ट्रेन सुरु करण्यात येत आहेत. लवकरच वंदे भारत स्लीपर एक्स्प्रेस महाराष्ट्रातही धावणार आहे.

महाराष्ट्रातील नागपूर ते मुंबई आणि नागपूर ते पुणे या लोहमार्गावर ही वंदे भारत स्लीपर एक्स्प्रेस धावणार असल्याची माहिती नागपूर रेल्वेचे डीआरएम विनायक गर्ग दिली. त्यामुळे लवकरच नागपूर आणि, पुणे, मुंबईच्या प्रवाशांना हा हायटेक एक्स्प्रेसची सफर करता येणार आहे. या ट्रेनमध्ये १६ कोच असणार असून ताशी १४० ते १६० किमी वेगाने ही ट्रेन धावणार आहे.



# असंघटित कामगारांना योजनांचा लाभ देण्यासाठी आराखडा तयार करावा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या ई श्रम पोर्टलवर नोंदीत असलेल्या विविध क्षेत्रातील व्यवसाय निहाय वर्गीकरणानुसार असंघटित कामगारांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी एकत्रितपणे आराखडा सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी कामगार विभागाचा आढावा घेऊन येत्या १०० दिवसांत करावयाच्या कामांसंदर्भात सूचना केल्या.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री आशिष जैस्वाल, इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कामगारांसाठी सध्या असलेल्या ईएसआय रुग्णालयांचे बळकटीकरण करून चांगल्या सेवा देण्यात याव्यात. तसेच कुशल मनुष्यबळासाठी कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी आयटीआयच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम आखावा. असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठीच्या योजना भविष्यातही सुरू राहतील याची दक्षता घ्यावी.

सध्या राज्यात सुमारे दीड कोटी नोंदीत कामगार आहेत. या कामगारांबरोबर इतरही क्षेत्रातील असंघटित कामगारांसाठी विविध योजना एकाच प्लॅटफॉर्मवर आणण्यात याव्यात. उद्योग व नियामक यांच्यात वेगवान समन्वय साधण्यासाठी 'बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट सिस्टीम' प्रणाली ही ऑनलाईन सेवा सुरू करावी, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए. कुंदन यांनी विभागाचे सादरीकरण करून येत्या १०० दिवसांत करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली.

### बैठकीतील मुद्दे

- विविध अंमलबजावणी यंत्रणांकडून उपकर जमा करण्यासाठी सेस पोर्टल तयार करणार
- बांधकाम कामगारांसाठी सुधारित योजना राबविणार
- रिएक्टर वापराबाबत नवीन प्रारुप नियम तयार करणार
- महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक अधिनियमात सुधारणा करणार
- औद्योगिक न्यायाधिकरण नियमांचा प्रस्ताव तयार करणार
- केंद्र शासनाच्या नवीन कामगार संहितेची अंमलबजावणी
- कुशल मनुष्यबळासाठी आयटीआयच्या सहाय्याने प्रशिक्षण केंद्राची स्थापना

## भाजप नेते किरीट सोमय्या यांनी घेतली मयत रोहित गवळीच्या कुटुंबाची भेट

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी एका वर्षात दुसऱ्यांदा मयत रोहित गवळी कुटुंबाची भेट घेतली आहे. रायगड हॉस्पिटल विरोधातील ही लढाई असून येथील डॉक्टर आणि मालकावर रोहित गवळी मृत्यू प्रकरणात हलगर्जी केल्याप्रकरणी कारवाई व्हावी म्हणून सोमय्या यांनी नेरळ पोलीस प्रशासनाची देखील भेट घेतली.दरम्यान रायगड हॉस्पिटल विरोधात पोलीस प्रशासनाने आठवड्यात कारवाई न केल्यास आपण पीडित कुटुंबाला सोबत घेऊन नेरळ पोलीस ठाण्यात उपोषणास बसणार असल्याचं त्यांनी सांगितले



कर्जत तालुक्यातील नेरळ मानिवली गावाचा रविवाशी असलेला रोहित भगवान गवळी या १६ वर्षीय तरुणाचा भिवपुरी डिक्सल येथील रायगड हॉस्पिटलमध्ये अपेंडिस या आजारावर शस्त्रक्रियेदरम्यान २० फेब्रुवारी २०२४ रोजी मृत्यू झाला होता.डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रोहितला आपला जीव गमवावा लागला असल्याचा आरोप पीडित कुटूंबाकडून करण्यात आला होता,या प्रकरणात मुंबई जेजे रुग्णालयाचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर हॉस्पिटल विरोधात नेरळ पोलीस ठाण्यात ३०४ र आणि ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

भाजप नेते सोमय्या यांनी मयत रोहित प्रकरणात न्याय मिळवून देण्यासाठी आश्वासित केले होते.त्यानुसार त्यांनी हे प्रकरण मानव अधिकार आयोगाच्या कोर्टात नेले होते.रायगड हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी पनवेल न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी धाव घेतली होती.

गुरुवारी( दि.९) रोजी भाजप नेते सोमय्या यांनी पीडित कुटुंबाची वर्षभरात दुसऱ्यांदा भेट घेतली. तसेच नेरळ पोलिसांची भेट घेत रायगड हॉस्पिटल,डॉक्टर आणि मालक यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली.यावेळी सोमय्या यांच्या सोबत भारतीय जनता पार्टीचे नितीन कांदळगावकर,राजेश भगत,संदीप म्हसकर,सभाजी गरुड,संदेश कराळे यांसह भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

## सायबर क्राइम व लैंगिक शोषणविरोधी कायद्यासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

रेजिंग डे सप्ताहाच्या निमित्ताने दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्युनियर कॉलेज आणि विद्यालयातील विद्यार्थ्यांना साइबर क्राईम आणि लैंगिक शोषण विरोधी कायद्याबद्दल महत्त्वपूर्ण मार्गदर्शन देण्यात आले.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीसंदर्भात माहिती दिली. तसेच, गुड टच-बॅड टच आणि लैंगिक शोषण विरोधी कायद्यांवर मार्गदर्शन केले. कधी शोषण किंवा धोका जाणवला, तर त्यांना पोलिसांकडे किंवा त्यांच्या विश्वासार्ह शिक्षकांकडे पोहोचावे लागेल. कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार घडला तरी ते लपवून ठेवू नका, असे त्यांनी सांगितले.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक सचिन मापुस्कर, व्यवस्थापन समिती सदस्य चंद्रमणी मोरे आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यशस्वी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शिक्षक आणि कर्मचार्यांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले.कार्यक्रमाच्या समाप्तीला मुख्याध्यापक मापुस्कर यांनी आभार मानले, तर सूत्रसंचालन मिसबा पुरकर यांनी केले.


# पद्मदुर्ग किल्ल्यावर जेट्टी नसल्याने पर्यटकांचे हाल

## ■ जेट्टी बांधल्यास ऐतिहासिक जलदुर्गावर प्रवास होणार सुखकर!

**मुरुड : प्रतिनिधी**

ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ल्यावर जेट्टी ची सुविधा नसल्याने किल्ल्यात उतरताना जेट्टीअभावी महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान बालकांना छोट्या बोटीची मदत घ्यावी लागते. पर्यटकांचा ओघ वाढण्यासाठी पद्मदुर्ग किल्ल्यावर जेट्टी उभारावी अशी मागणी पर्यटकांकडून होत आहे.

जंजिरा आणि पद्मदुर्ग (कासा) हे दोन्ही किल्ले पुरातत्व खात्याच्या दृष्टीने राष्ट्रीय ठेवा आहे .मार्च २०२४ पासुन मेरीटाईम बोर्डाकडून परवानगी असलेल्या ठेकेदारांकडुन खोराबंदर ते पद्मदुर्ग किल्ला ही प्रवासी वाहतूक सेवा कार्यरत आहे.



**पद्मदुर्ग किल्ल्यावर जेट्टी तसेच अन्य संवर्धन बाबीं करीताअंदाजपत्रकाप्रमाणे निधीही उपलब्ध आहे परंतु पुरातत्व विभागाकडे ३ वर्षांहून अधिक काळा पासुन परवानगीसाठी पत्रव्यवहार सुरु असुन ही परवानगी नाही.**
**-डी.बी. पवार, उपअभियंता, मेरीटाईम बोर्ड.**

सकाळी ९ ते दुपारी ४.३० पर्यंत भरती ओहोटी नुसार पर्यटकांची ने - आण सुरु असते . प्रति प्रवाशी रुपये ११० शुल्क आकारले जाते .साधारण २० मिनीटे जायला व तेवढाच वेळ यायला लागतो . पाऊण तास किल्ल्या पाहण्यासाठी दिला जातो . एका होडीत सारंग , इंजिन चालक व ३ खलासी तैनात असतात .

जेट्टी नसल्यामुळे होडीसोबत छोटी होडी देखिल न्यावी लागते. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दरवर्षी ४ ते ५ लाख पर्यटक देश विदेशातून भेट देतात. पण जवळच असलेल्या .पद्मदुर्ग किल्ल्याचे ऐतिहासिक दृष्ट्या अधिक महत्त्व असले तरी जेट्टीची व्यवस्था उपलब्ध नसल्याने तुलनेने खुप कमी पर्यटक भेट देतात

गतवर्षी मेरीटाईम बोर्डाचे उच्च पदस्थ,पुरातत्व विभागाचे अधिकारी व खासदार सुनील तटकरे व आमदार महेंद्र दळवी यांनी संयुक्तपणे पद्मदुर्ग किल्ल्याची पहाणी केली होती. सदर पाहणी दौऱ्यात प्रवेशद्वारावर २ दरवाजे बसविण्यात यावेत जेणेकरून किल्ल्यात अनुचित प्रकारांना आळा बसेल असे पुरातत्व खात्याचे म्हणणे होते मात्र ते ही काम पुर्ण झालेले नाही

जेट्टीसाठी लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केला तरच काम पुर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे .

# तळोजातून तोतया आयकर अधिकारी जाळ्यात

**पनवेल : वार्ताहर**

बीकेसी आयकर विभागात काम करणारा कंत्राटी चालकच बनावट आयकर अधिकारी म्हणून वावरत होता. या बनावट आयकर अधिकार्याला मंगळवारी (दि.७) गुन्हे शाखेच्या युनिट तिनच्या पोलिसांनी तळोज्यातून अटक केली आहे. आरोपीकडे अनेक आयकार्ड, बनावट शिक्के, नियुक्तीपत्रे व इतर कागदपत्रे सापडली आहेत.

या आरोपीने किती लोकांना आयकर विभागात नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून फसवणूक केली आहे, याचा तपास सुरू असल्याची माहिती गुन्हे विभागाचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. तसेच आरोपीला वसई न्यायालयात हजर केल्यावर ५ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

अजमेरी बिल्डिंगमध्ये राहणार्या सफारुद्दीन खान (४९) यांच्या मुलीला आयकर विभागात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून १५ लाख रुपयांची फसवणूक केली होती. आरोपी रिंकू शर्मा व अंशु पासी या दोघांनी त्यांच्या मुलीला आयकर विभागात कामाला लावतो, असे सांगितले होते. त्यांच्या मुलीला आयकर विभागाचे ओळखपत्र व ट्रेनिंगचे पत्र देऊन तिला नोकरीला न लावता आर्थिक फसवणूक केली होती. पेल्हार पोलिसांनी १३ डिसेंबरला गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार करत होते.

तपासादरम्यान रिंकू शर्मा (३३) तळोज्यात असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. आरोपीला पोलिसांनी मंगळवारी सापळा लावून ताब्यात घेतले. त्याची झडती घेतल्यावर २८ बनावट आयकर विभागाचे आयकार्ड, अनेक शिक्के, नियुक्तीपत्रे व इतर कागदपत्रे सापडली. माहिती मिळताच फसवणूक झालेल्या लोकांनी गुन्हे शाखेच्या कार्यालयात गर्दी केली. आतापर्यंत ४० ते ४२ सुशिक्षित बेरोजगार तरुण, तरुणींना बनावट आयकर निरीक्षकाचे आयकार्ड व नियुक्ती पत्रे देऊन दोन कोटीपेक्षा अधिक रुपयांना गंडा घातला असल्याची माहिती समोर आली आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, सपोनि सोपान पाटील, पोउपनिरी उमेश भागवत, सफौ. अशोक पाटील, पोहवा मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, राकेश पवार, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, सुनिल पाटील, मनोहर तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, मसुब प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे तसेच सायबर सेलचे संतोष चव्हाण यांनी केली आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा नशामुक्त नवी मुंबई अभियानाच्या उद्घाटन समारंभात सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या नशा मुक्त नवी मुंबई या अभियानाचे उद्घाटन बुधवार ( दि. ८) रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले या वेळी वनमंत्री गणेश नाईक तसेच रश्मी शुक्ला पोलीस महासंचालक तसेच अभिनेता जॉन अब्राहम आदी मान्यवर उपस्थित होते.

या उद्घाटनांमध्ये रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन त्यांच्या सादरीकरणातून नशामुक्ती संदेश श्रोत्यांना दिला.




या अभियानाचा प्रमुख उद्देश नवी मुंबईमधील नागरिकांना व तरुणांना नशामुक्त करणे त्यांना ड्रग्ज घेण्यापासून वाचवणे तसेच नशाविषयी त्यांना जागरूक करणे हे होते. या वेळी नवी मुंबई आयुक्तालयाने नागरिकांना व तरुणांना एकत्र येऊन भारत देश नशा मुक्त करूया असा एक संदेश दिला तसेच टोल फ्री क्रमांक ही जाहीर करण्यात आला.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हे नेहमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे उपक्रम घेत असते तसेच वेगवेगळ्या सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमामध्ये सहभाग घेत असते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या नशामुक्त नवी मुंबई अभियानाच्या उद्घाटन समारंभात सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या. या नशा मुक्त नवी मुंबई उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

पान १ वरुन

### ५० टक्के सवलतीच्या दरात एलईडी टीव्ही व रेंजर सायकल

तंत्रज्ञानाच्या युगात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे जीवनाचा भाग झाली आहेत. ब्लॅक अँड व्हाईट टीव्ही, कलर टीव्ही, एलसीडी, त्यानंतर अधिक स्पष्टतेसाठी एलईडी असे तंत्रज्ञान बदल घडत गेले. त्याचप्रमाणे शरीर आणि आरोग्याच्या दृष्टिकोनातून सायकलचा वापर वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर या वस्तू नागरिकांना कमी दरात मिळाव्यात यासाठी ५० टक्के सवलत ही योजना राबवत आहोत. त्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले असून ८३०८४६६४४८ किंवा ९५५२४६८३८८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.

## अलिबाग चोंढी स्मशानभूमी येथे ११ हजार रोपांची मियावाकी पद्धतीने लागवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील स्मशानभूमीजवळच्या मोकळ्या जागेत विविध प्रकारच्या ११ हजार रोपांची मियावाकी पद्धतीने लागवड करण्यात आली. आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया आणि ग्रुप ग्रामपंचायत किहीम यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प राबवण्यात आला आहे.

आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया ही संस्था मागील काही वर्षांपासून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी असा उपक्रम राबवत आहे. वनीकरण तसेच भूजल पातळी वाढावी यासाठी अलिबाग तालुक्यातील स्थानिक ग्रामपंचायत, वनविभाग व इतर सामाजिक संस्था व कार्यकर्ते यांच्या माध्यमातून



विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण सुरू आहे.

किहीमचे सरपंच प्रसाद गायकवाड गायकवाड यांच्या संकल्पनेतुन आम्ही मियावाकी पद्धतीने तब्बल ११ हजार रोपांची लागवड करत आहोत, असा मियावाकी पद्धतीने वृक्षांची लागवड करण्याचा आमचा रायगड जिल्ह्यातील पहिलाच प्रयत्न करीत असल्याचे आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया संस्थेच्या अलिबाग तालुका प्रकल्प व्यवस्थापक अमृता पराडकर यांनी या वेळी सांगितले.

**काय आहे मियावाकी पद्धत म्हणजे?**

*मियावाकी ही मानवनिर्मित जंगलपद्धती आहे. यामध्ये कमी जागेत जास्तीतजास्त देशी झाडे लावण्याची पद्धत. या पद्धतीचा शोध जपानी वनस्पती शास्त्रज्ञ अकिरा मियावाकी यांनी लावला. या पद्धतीत प्रत्येक चौरस मीटरमध्ये दोन ते चार वेगेगळ्या प्रकारची देशी झाडे लावली जातात. यात क्षेत्र किती असावे याचे बंधन नसले तरी ठराविक क्षेत्रात योग्य संख्येनेच वृक्ष असायला हवेत. या पद्धतीचे उद्दिष्ट जमिनीवर हिरवे आच्छादन वाढवणे हा असतो. या पद्धतीने २ ते ३ वर्षात चांगली झाडे तयार होतात.*

## लॉर्ड बुद्धा एमपीफ्रिडा इन्व्हेस्टमेंट्स अँड फायनान्स लिमिटेडचा भव्य प्रारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

वंचित समाजातील लाखो महत्त्वाकांक्षी नवउद्योजकांच्या हितासाठी स्थापन करण्यात आलेल्या लॉर्ड बुद्धा एमपीफ्रिडा इन्व्हेस्टमेंट्स अँड फायनान्स लिमिटेडचे उद्घाटन रविवार, (दि.१२) रोजी सकाळी १० वाजता मुंबईतील दादर (पश्चिम) येथील छत्रपती शिवाजी मंदिर नाट्यगृहामधील राजर्षी शाहू महाराज सभागृहात होणार आहे.

या ऐतिहासिक क्षणी उपस्थित राहून वंचित समाजातील उद्योजकांनी आर्थिक क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

संस्थेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक भगवान गवई यांनी सांगितले की, आजच्या गुंतवणूकदारांची गुंतवणूक ही केवळ परताव्यासाठी नसून, वंचित समाजातील येणाऱ्या पिढ्यांना त्यांची उद्योजकीय स्वप्ने साकार करण्यास आणि चिरस्थायी आर्थिक परिवर्तन घडवण्यास सक्षम बनवणारी ठरेल. संस्थेने स्थापनेपासून आतापर्यंत २.७५ कोटी रुपयांचे भागभांडवल उभे केले असून लवकरच ही संस्था आर्थिक सेवांद्वारे अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारी अग्रगण्य बिगर बँकिंग वित्तीय संस्था म्हणून ओळखली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सामाजिक प्रगती आणि आर्थिक विकासाची सांगड घालणाऱ्या या ऐतिहासिक प्रवासात सर्व वंचित बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि या उपक्रमाद्वारे आपल्या समाजबांधवांना सर्वतोपरी सहाय्य करण्याची ही संधी साधावी, असे आवाहन भगवान गवई यांनी केले आहे.

कार्यक्रमात सहभागी व्हायचे असल्यास कृपया भगवान गवई यांना +९१ ९३५९०३२३९० या नंबर वर कॉल न करता फक्त व्हाट्सॲपवर मेसेज करावा

## निवडक

### बांगलादेशी नागरिकावर कारवाई

**पनवेल :** तळोजा पोलिसांनी एका बांगलादेशी नागरिकावर कारवाई केली आहे. तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका कंन्स्ट्रक्शन कंपनीजवळ बांगलादेशीय नागरिक कबीर हबीबुर शेख (२०) हा असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तळोजा पोलीस ठाण्याचे वपोनि प्रवीण भगत व त्यांच्या पथकाने छापा टाकून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे भारतीय कागदपत्रे सापडली नाहीत म्हणून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

### महामुंबई सेझची सुनावणी तहकूब

**उरण :** महामुंबई सेझ कंपनीने सुनावणीदरम्यान बाजु मांडण्यासाठी असमर्थता दर्शविली. त्यामुळे सुनावणी जिल्हाधिकाऱ्यांनी २२ जानेवारी २०२५पर्यंत पुढे ढकलली आहे. रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी महामुंबई सेझ कंपनी विरोधातील सुनावणी मुक्रर केली होती. आजच्या सुनावणी दरम्यान महामुंबई सेझग्रस्त समितीने शेतकऱ्यांची बाजू मांडण्याची तयारी दर्शवली होती, मात्र महामुंबई सेझ कंपनीने काही कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी आणखी वेळ मागितल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी सुनावणी १४ दिवस म्हणजे २२ जानेवारीपर्यंत तहकूब केली आहे.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका ज्येष्ठ नागरिकाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ६५ ते ६८ दरम्यान असून तो उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे उपचार घेत होते. त्यानंतर जे.जे.रुग्णालय मुंबई येथे दाखल करण्यात आले, परंतु तेथे त्यांचा मृत्यू झाला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोउपनि संजय अस्पतराव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डॉ. सेजल नील यांचा सन्मान

**पनवेल :** डॉ. सेजल नील हिला स्त्री रोग व प्रसूती या विषयात उच्च शिक्षणासाठी नांदेड सरकारी मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. याबद्दल तिचा नवीन पनवेल नील हॉस्पिटल येथे पत्रकार उत्कर्ष समितीकडून सन्मान करण्यात आला. यासोबतच डॉ. शुभदा नील, ज्ञानेश्वर बर्वे व भक्ती बर्वे, मंगला गडमुळे यांचा सत्कार करण्यात आला.



# एचएमपीव्ही विषाणूशी लढण्यासाठी पनवेल मनपा आरोग्य यंत्रणा सतर्क

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर फैलाव झालेल्या एचएमपीव्ही (एचएमपीव्ही) या विषाणूच्या अनुषंगाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार पनवेल महानगरपालिकेची आरोग्य यंत्राणा सतर्क झाली आहे. एचएमपीव्ही रूग्णांच्या उपचारासाठी उपजिल्हा रूग्णालयात २० राखीव खाटा तसेच एमजीएम रूग्णालयामध्ये ५० राखीव खाटा ठेवण्यात आल्या आहेत.

सध्या चीनमध्ये मानवी मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) याचा उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत. तसेच देशभरातदेखील या विषाणूचे रूग्ण मिळू लागले असल्याने आयुक्तांच्या निर्देशाप्रमाणे पनवेल महानगरपालिका सज्ज झाली असून उपजिल्हा रूग्णालयात २० राखीव खाटा तसेच एमजीएम रूग्णालयामध्ये ५० राखीव खाटा ठेवण्यात आल्या आहेत. तसेच गरज भासल्यास कळंबोलीतील जुन्या कोविड सेंटर येथे ऑक्सीजनयुक्त ६० खाटा सुरू करण्याबाबत महापालिकेने तयारी सुरू



केली असल्याची माहिती मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.

याबरोबरच महापालिकेच्या १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या सर्व खाजगी रूग्णालयांना एचएमपीव्ही साथरोगाची लक्षणे असणाऱ्या रूग्णांची माहिती राज्य शासनाच्या साथरोग सर्वेक्षण पोर्टलवर आद्ययावत करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहेत तसेच वेळोवेळी महापालिकेच्या वतीने पिडीयाट्रिक टास्क फोर्स मार्फत मार्गदर्शन घेण्यात येईल. नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घेण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

#### एचएमपीव्ही विषाणूशी लढण्यासाठी हे करा :

१. जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका.
२. साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवा.
३. ताप, खोकला व शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा.
४.भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक खा.
५. संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्या.

**हे करू नये :**

१. हस्तांदोलन २. टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर ३. आजारी लोकांशी जवळचा संपर्क ४. डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे.
५.सार्वजनिक ठिकाणी थुंकणे.
६. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेणे.

# बचत गटांच्या उत्पादनांचे आजपासून विक्री प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत असलेल्या स्वयंसहाय्यता बचत गटांद्वारे विविध उत्पादनांची निर्मिती केली जाते. या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी तीन प्रभागामध्ये भव्य विक्री प्रदर्शनाचे आयोजन १० ते १२ जानेवारी २०२५ रोजी करण्यात येणार आहे. या विक्री प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

पनवेल महापालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत द्रारीद्र्य रेषेखाली ४१५ बचत गट चालवले जातात. या बचत गटांना उपजिविकेच्या संधी मिळवून देण्याच्या दृष्टीने महानगरपालिका स्तरावर भव्य विक्री प्रदर्शनाचे आयोजन करण्याबाबत आयुक्तांनी सूचित केले असल्याची माहिती उपायुक्त बाबासाहेब राजळे यांनी दिली आहे. येत्या १४ जानेवारी रोजी मकर संक्रांतीचा सण असून या सणाच्या पार्श्वभूमीवरती पनवेल शहर तसेच कामोठे, नावडे येथे १० ते १२ जानेवारी रोजी भव्य विक्री प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सहाय्यक आयुक्त स्मिता काळे यांनी प्रदर्शनाचे नियोजन केले आहे.

#### प्रदर्शनाची ठिकाणे

१. प्रभाग समिती – 'अ' नावडे उपविभाग –मीठास स्विटस् कॉर्नर से. १३ फेज १ तळोजा
२. प्रभाग समिती–कमोठे –सिडको कम्युनिटी सेंटर
३. प्रभाग कार्यालय –पनवेल– प्रभाग कार्यालय समोर पाण्याची टाकी, शिवाजी चौक येथे

# आनंदी ग्रुपकडून विविध समस्यांबाबत पोलिसांसोबत चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आनंदी ग्रुपच्या सदस्यांनी खांदेश्वर पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक ढाकणे मॅडम यांची भेट घेऊन खांदेश्वर मंदिराचा परिसर व शनी मंदिराच्या समोर जी भिकाऱ्यांची रांग लागते, त्या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

याचबरोबर खांदेश्वर मंदिराच्या परिसरामध्ये संध्याकाळच्या वेळेस जे अश्लील चाळे चालतात त्या संदर्भातदेखील चर्चा करण्यात आली. मॅडमच्या सूचनेनुसार आनंदी ग्रुपच्या



लेटरहेडवर निवेदन द्यायचे ठरले आहे. या वेळी ढाकणे मॅडम यांनी त्यांना एक फोन करून शनिवार आणि सोमवारी शनी मंदिराच्या समोर व खांदेश्वर मंदिराच्या येथे पोलीस बंदोबस्त पाठवण्यासंदर्भात आठवण करून देण्याचे आनंदी ग्रुपच्या शिष्टमंडळाला या वेळी सांगितले.

आनंदी ग्रुपचे सदस्य भिमराव पोवार, मोतीलाल कोळी, सुभाष गावडे, राजाराम घुगे, नेवारे साहेब, सुरेश म्हात्रे, प्रमोद बेर्डे, शिवाजी पाटील, प्रदीप इंगळे व विश्राम एकंबे यांनी पोलीस ठाण्याला भेट देऊन या वेळी चर्चा केली.

### घड्याळाची चोरी

**पनवेल :** लघुशंका करत असताना एका वृद्ध व्यक्तीच्या हातातून ९५ हजार रुपयाच्या महागड्या घड्याळाची चोरी अज्ञात व्यक्तीने केल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली आहे. सदाशिव ठाकूर हे त्यांच्या घराजवळ लावलेल्या पत्र्याच्या शेजारी लघुशंका करीत असताना तेथे एक अज्ञात व्यक्ती आली व त्याने त्यांच्या हातातील महागडे घड्याळ हिसकावून मोटरसायकलवरून पळून गेला आहे.

# अध्यापक महाविद्यालयाची लिमये वाचनालयाला सदिच्छा भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथील प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र अध्यापक, प्रा. बिजली दडपे, प्रा. डॉ खाडे बी.जी., डॉ. सुभेदार पी.पी., डॉ. मोरे एन.ए., डॉ. उज्वला डोणे आणि प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी मंगळवारी (दि.७) के गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयास भेट दिली.

या वेळी के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय कार्यकारी मंडळाच्या अध्यक्ष ॲड. सुनिता श्रीकांत जोशी तसेच कार्यवाहक. बी.पी. म्हात्रे सर, ग्रंथपाल, निकेता शिंदे तसेच ग्रंथालयाचा स्टाफ



या वेळी उपस्थित होता.

ॲड. सुनिता जोशी, कार्यवाह बी. पी. म्हात्रे, प्रा. बिजली दडपे, बीएड. छात्र अध्यापक अविनाश काठवटे, कार्तिकी सोनटक्के यांनी आपले विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन लेखक रोहिदास पोटे यांनी केले.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी वाचन संस्कृती वाढविण्यासाठी काय करता येईल याविषयी मार्गदर्शन केले. सर्व छात्रअध्यापकांना ग्रंथालयातील पुस्तके हाताळण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. प्रियांका सुभेदार यांनी केले. कार्यकारिणी सदस्य व ग्रंथालयातील स्टाफ या सर्वांचे आभार डॉ. प्रियांका सुभेदार यांनी मानले.

### सोन्याची चेन लांबविली

**पनवेल :** एका ज्येष्ठ नागरिकाला बोलण्यात गुंतवून त्यांच्याकडील सोन्याची चेन लांबविल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

लाईनआळी येथे राहणारे ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरिक आपली टपरी उघडून टपरीची साफसफाई करत असताना तेथे एका व्यक्तीने नोटांचे बंडल काढून या नोटा देवाला मंदिरात जावून दान करा असे सांगितले. व या नोटांवर तुमच्याकडील सोन्याचे दागिने ठेवा, या वेळी त्यांनी गळ्यातील सोन्याची चेन काढून त्याच्याकडे दिली असता हातचलाखीने चेन लंपास केली आणि ५ मिनिटाने नोटांची पुडी उघडा असे सांगितले व हातचलाखीने ४० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन नोटांसह पळवून नेल्याची घटना घडली आहे.

# देवद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे दिनेश वाघमारे बिनविरोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देवद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे दिनेश वाघमारे यांची बिनविरोध निवड झाली. उपसरपंच विजय वाघमारे यांनी पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेसाठी ही निवडणूक घेण्यात आली.

या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरूणशेठ भगत, सरपंच विनोद वाघमारे, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, किशोर सुरते, यतिन देशमुख, ग्रामपंचायत अधिकारी दीपक कोंडविलकर, ग्रामपंचायत सदस्य संदीप वाघमारे, माजी उपसरपंच विजय वाघमारे, सदस्या साधना वाघमारे, सदस्य चंद्रा वाघमारे, कुंदा वाघमारे,



संदीप वाघमारे, मानसी वाघमारे, आकांक्षा रसाळ, करुणा वाघमारे, विनोद वाघमारे, दिनेश वाघमारे, ग्रामसेवक दीपक कोंडबीळकर सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी बोलताना अरुणशेठ भगत यांनी, देवद ग्रामपंचायतीचे पदाधिकारी चांगल्या पद्धतीने कार्यरत आहेत. एकमेकांना सहकार्य करूनच गावाचा विकास होत असतो, असे सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी देवदमध्ये आणण्यासाठी सरपंच आणि उपसरपंच यांनी प्रयत्नशील रहावे तसेच पक्षवाढीकडेदेखील लक्ष घालून सदस्य नोंदणी संख्या वाढवावी, असेही ते म्हणाले.

विद्यमान उपसरपंच दिनेश वाघमारे यांनी, गावात सरपंच विनोद वाघमारे यांच्या नेतृत्वात विकासकामे जोरात सुरू आहेत. त्यांचे हात बळकट करण्यासाठी आमची कार्यकारिणी प्रयत्नशील राहणार आहोत. ग्रामपंचायतीची सर्व कार्यकारिणी एकमेकांना सहकार्य करणारी असल्याने विकासात कोणताही अडथळा येत नाही, असे सांगितले. त्याचप्रमाणे कोणतेही राजकारण न करता विकासकामांना आपण प्राधान्य देणार असल्याचेदेखील वाघमारे शेवटी म्हणाले.

# सीकेटी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयाचे २९वे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण सोहळा महाराष्ट्राची लोकपरंपरा या शीर्षकाखाली मोठ्या बुधवारी (दि. ८) उत्साहात झाला.




या स्नेहसंमेलन सोहळ्याचे अध्यक्षस्थान जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकरिणी सदस्य अनिल भगत यांनी भूषवले. स्नेहसंमेलनाला पोलीस सब इन्स्पेक्टर प्रल्हाद माताळे, शकुंतला रामशेठ ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सभासद अर्चना ठाकूर, पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, माजी नगरसेविका सुशीला घरत, राजश्री वावेकर, माजी गट शिक्षक अधिकारी तथा शालेय पोषण आहार अधीक्षक नवनाथ साबळे, रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य अमित जाधव, आगरी शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक भगत, निवृत्त शिक्षक संघटना अध्यक्ष नरेश पाटील, शाखा अधिकारी आयडीबीआय बँक पनवेलकडून शिल्पा जैस्वाल, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष अर्चना पाटील, सुकापुर ग्रामपंचायतीच्या सदस्य प्राची जाधव, सामाजिक कार्यकर्ते अंकुश माताळे, उच्च माध्यमिक विभाग प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक मुख्याध्यापक संतोष चव्हाण, निलिमा शिंदे, उच्च माध्यमिक पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, संगीत शिक्षक संतोष खरे व अर्चना पाटील, सहाय्यक शिक्षक युवराज धनवटे, सहाय्यक शिक्षक पंढरीनाथ जाधव आदी उपस्थित होते.

मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व प्रास्ताविकेतून मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाची प्रगतीच्या दिशेने होत असलेली वाटचाल; त्यासाठी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व संचालक मंडळ यांचे मिळत असलेले सहकार्य याची आवर्जून माहिती सांगितली.

पारितोषिक वितरण सोहळ्यात विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा, पालकांचा व शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. मुख्याध्यापक मानकर यांना चिल्ड्रेन अकॅडमी व गौतम एज्युकेशन सोसायटी इचलकरंजी यांच्यातर्फे बेस्ट स्कूल अवॉर्ड व क्टिव्ह मुख्याध्यापक अवॉर्ड प्रमुख अतिथी पोलीस सब इन्स्पेक्टर प्रल्हाद माताळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला तसेच रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर यांच्या वतीने दिला जाणारा वोकेशनल एक्सलन्स अवॉर्ड २०२४–२५ मुख्याध्यापक सुभाष मानकर यांना मिळाल्याबद्दल समारंभाचे अध्यक्ष अनिल भगत यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. सहाय्यक शिक्षिका विजयश्री थळी व मंजिरी धोत्रे यांना वरील संस्थांतर्फे ॲक्टिव्ह टीचर अवॉर्ड मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये 'प्रतिबिंब'साठी ऑडिशन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सांस्कृतिक समितीच्या वतीने ३१ जानेवारी रोजी होणाऱ्या अन्युअल ग्यादरिंग (प्रतिबिंब) व पारितोषिक वितरण समारंभासाठी शुक्रवारी (दि.६) ऑडिशन घेण्यात आल्या.

रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे सामाजिक, पर्यावरणीय व सांस्कृतिक उपक्रम घेत असतं त्याचाच एक भाग म्हणून सांस्कृतिक समितीने येणाऱ्या निमल गॅदरिंग व पारितोषिक वितरण समारंभासाठी गायन, सूत्र संचालन व नृत्य यांच्या ऑडिशन्स घेण्यात आल्या. या ऑडिशनसाठी महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील विद्यार्थी व



विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला.

या ऑडिशनसाठी सांस्कृतिक समितीतील सर्व सदस्यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले व विद्यार्थ्यांची निवड केली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व निमल गॅदरिंग व पारितोषिक वितरण समारंभासाठी शुभेच्छा दिल्या.

या ऑडिशनचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा समन्वयक सांस्कृतिक समिती, यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. तनुजा सुमन, प्रा. नीलम मोरे, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. नंदिनी सपकाळ, प्रा. शिवानी मानकामे, सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## संपादकीय

# दिल्लीची रणधुमाळी

'इंडिया' आघाडीमध्ये 'आप' आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष एकत्र येऊन भाजपच्या विरोधात उभे ठाकले असले तरी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात मात्र त्यांनी मैत्रीचे पाश तोडून टाकले आहेत. 'इंडिया' आघाडीतले हे मित्र दिल्लीतील निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात आरोप-प्रत्यारोपांची राळ उडवत आहेत.

**राजधानी दिल्ली हे स्वतंत्र राज्य असले तरी संपूर्ण राज्याचा दर्जा दिल्लीला नाही. तरीही दिल्लीकडे सर्वांचेच लक्ष लागलेले असते. भारतीय जनता पक्षाचा जबरदस्त रेटा एकहाती थोपवून आम आदमी पक्षाने दिल्लीचा गढ गेले जवळपास दशकभर यशस्वीरित्या राखला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासारखे देशभर अजिंक्य ठरलेले सेनापती भाजपच्या फौजेला लाभलेले असले तरी दिल्लीने मात्र त्यांना हुलकावणी दिली. यामध्ये आम आदमी पक्षाचे यश कमी, परंतु त्या पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांचेच यश मानले पाहिजे. केजरीवाल यांनी भाजपचा कडवा विरोध पचवून आपली लढाई सुरू ठेवली आहे. भाजपच्या झंझावातापुढे काँग्रेस पक्षाचा पाचोळा झाला, त्यांची उरलीसुरली लक्तरे केजरीवाल यांच्या 'आप'नेच काढली. येत्या ५ फेब्रुवारीला राजधानी दिल्लीत मतदान होईल आणि ८ फेब्रुवारीला निकाल लागणार आहे. विधानसभेच्या सर्व ७० जागांसाठी एकाच दिवशी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. गेल्या तीन टर्म्स आम आदमी पक्षाने दिल्लीत कारभार केला. सरकार शाळांमध्ये केलेल्या अभिनव सुधारणा, मोहल्ला क्लिनिक यांसह अनेक लोककल्याणकारी योजनांची बरसात केजरीवाल सरकारने दिल्लीकरांवर केली. त्याने नाही म्हटले तरी दिल्लीकर सुखावलेच असणार. परंतु आता मात्र परिस्थिती बदलली आहे. सामान्य माणसाचे सरकार म्हणून आम आदमी पक्ष सत्तेवर आला. मी लाल दिव्याची गाडी वापरणार नाही, सरकारी इतमाम ठेवणार नाही, इतकेच नव्हे तर सरकारी निवासस्थान देखील स्वीकारणार नाही असे शपथपूर्वक जाहीरपणे सांगणाऱ्या केजरीवाल यांनी पुढे सारी काही यथासांग कोडकौतुक करून घेतले. छोट्या वाहनातून फिरणारे केजरीवाल लांबलचक गाड्यांच्या ताफ्यानिशी भरधाव जाताना दिसू लागले. जनता दरबारात लोकांनी केलेले चरणस्पर्श हसतमुखाने स्वीकारू लागले. इतकेच नव्हे तर, सत्तर-ऐंशी कोटी रूपये खर्च करून मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान त्यांनी सरकारी पैशातून सजवले. हंड्याझुंबरे, अत्याधुनिक महागडे नळ आणि फरशा अशा सुखसोयींनी युक्त मुख्यमंत्री निवासस्थानाचा उल्लेख त्यामुळेच 'शीशमहल' असा होऊ लागला. या आलिशान निवासस्थानाच्या व्हिडिओफिती आजही समाजमाध्यमांवर फिरत आहेत. एका आम आदमीचा खास आदमी कसा झाला याचे उत्तम उदाहरण केजरीवाल स्वत:च ठरले. मद्यघोटाळ्यात केजरीवाल यांच्यासह त्यांचे काही मंत्री देखील अडकले. भ्रष्टाचाराचे असंख्य आरोप झाल्यानंतर त्यांचे अर्धा डझन मंत्री तुरुंगाची हवा खाऊन आले. स्वत: केजरीवाल यांचीही तुरुंगवारी झालीच. विशेष म्हणजे मद्यघोटाळ्यापासून वादग्रस्त शीशमहलपर्यंत केजरीवाल आणि त्यांच्या पक्षावर जे गंभीर आरोप झाले, ते सारे काँग्रेस पक्षानेच केले होते. येत्या निवडणुकीत दिल्लीमध्ये काँग्रेसला फारसे स्थान उरलेले नाही. तसे बघायला गेले तर दिल्लीच्या रिंगणात यंदा तीन राष्ट्रीय पक्ष लढताना दिसतात – भाजप, काँग्रेस आणि केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष. पंजाबमध्ये देखील त्यांच्या पक्षाचे सरकार असल्यामुळे 'आप'ला राष्ट्रीय पक्ष गणले जात असले तरी प्रत्यक्षात यावेळी दिल्लीतील सत्ता हातची जाते की काय, अशी चिंता 'आप'ला सतावत आहे. दिल्लीकरांचा फैसला फेब्रुवारी महिन्यात समजेलच.**

# रायगडात गुन्ह्यांची उकल, अत्याचारात मात्र वाढ

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात २०२४ या वर्षामध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी ९९ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात रायगड पोलिसांना यश आले आहे. २०२४ मध्ये एकूण २९३३ गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी २९०१ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. ही जमेची बाजू असली तरी रायगड जिल्ह्यात २०२३ या वर्षाच्या तुलनेत २०२४ या वर्षभरात महिलांबाबतच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. यात १०७ बलात्काराच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. यातील ७३ बलात्कार अल्पवयीन मुलींवरील आहेत. यावरून रायगड जिल्ह्यात अल्पवयीन मुली असुरक्षित असल्याचे सिध्द झाले आहे. जिल्ह्यात महिलांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यात वाढ होणे त्यातही अल्पवयीन मुलींचे प्रमाण अधिक असणे ही चिंतेची बाब आहे.

रायगडा पोलीसांनी नुकतीच गुन्हेगारीची वार्षिक आकडेवारी प्रसिध्द केली आहे. या आकडेवारी नुसार रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचे दिसते. त्यातही महिलांवरील गुन्ह्यांचे प्रमाण मागील पाच वर्षात वाढत आहे. मागील वर्षाच्या तुलनेत २०२४ या वर्षात महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. २०२४ या वर्षात महिलांवर बलात्काराचे १०७ गुन्हे दाखल होते. हे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलीसांना यश आले आहे. परंतु महिलांवर होणार्या अत्याचारांचे प्रमाण वाढत आहे हे नाकरून चालणार नाही. २०२३ मध्ये बलात्काराचे १०० गुन्हे दाखल झाले होते. २०२४ मध्ये विनयभंगाचे १५७ गुन्हे दाखल झाले होते. पैकी १५२ गुन्हे उघडीस आले. २०२३मध्ये विनयभंगाचे १५२ गुन्हे दाख झाले होते. २०२४ या वर्षभरात १०७ बलात्काराच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. यातील ७३ बलात्कार अल्पवयीन मुलींवरील आहेत. यावरून रायगड जिल्ह्यात अल्पवयीन मुली असुरक्षित असल्याचे सिध्द झाले आहे. २०१९- २०पर्यंत रायगड जिल्ह्यात महिलांवरील लैंगिक अत्याचाराचे सरासरी वार्षिक ५० गुन्हे दाखल होत होते. गेल्या तीन वर्षांत महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांचे प्रमाण दुपटीने वाढले आहे. यातही अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार वाढले आहेत.



२०१९ मध्ये ४९ बलात्काराचे गुन्हे दाखल झाले होते. त्यानंतर यात वाढ होत राहीली. २०२० मध्ये ५८, २०२१ साली ५७, २०२२ मध्ये १०६ , २०२३ साली १०० तर २०२४ सालात १०७ बलात्काराचे गुंन्हे दाखल झाले. महिलांबाबत होणार्या गुन्ह्यामंध्ये वाढ होत आहे. त्यातही बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याअंतर्गत (पॉस्को) दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे. बलात्काराचे १०७ पैकी ७४ गुन्हे हे पॉस्को कायद्या अंतर्गतचे आहेत. म्हणजेच ही सर्व प्रकरणे अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराशी निगडीत आहेत. २०२४ या वर्षात अपहरणाचे १३० गुन्हे दाखल झाले होते. त्यात ९७ मुली आहेत. अपहरण करण्यात आलेल्या ७ मुलीचा शोध अजून लागलेला नाही. ही बाब सर्वांनाचा विचार करायला लावणारी आहे.



महिलांबाबात हाणार्या गुन्ह्यांबरोबरच इतरही गुन्हे वाढले आहेत. रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात २०२४ या वर्षात ३२ खुनाचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यापैकी ३० गुन्हे उघड करण्यात पोलीसांना यश आले. २०२३ च्या तुलनेंत खुनांच्या गुन्ह्यांमध्ये ६ने वाढ झाली आहे. २०२३ मध्ये खुनाचे २६ गुन्हे दाखल झाले होते. २०२४ मध्ये २७ खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल झाले होते. हे सर्व गुन्हे उघड करण्यात पोलीसांना यश आले आहे. २०२४ साली दरोड्याचा १ गुन्हा दाखल झाला होता, हा गुन्हा उघडकीस आला. ३२ जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी २६ गुन्हे उघड करण्यास यश आले. घरफोडीचे १६१ गुन्हे दाखल होते. पोलिसांनी ७५ गुन्हे उघड केले आहेत. सन २०२३ च्या तुलनेत १४ ने गुन्ह्याचे कमी झाले आहेत. चोरीचे ३६५ गुन्हे दाखल असून, त्यापैकी १९५ गुन्हे उघड झाले आहेत.

जबरी चोरी, घरफोडी व चोरीचे गुन्हे कमी दाखल झाले असले तरी दाखल झालेले गुन्हे उघड करण्याचे प्रमाण देखली कमी आहे. दंगलीचे ११४ गुन्हे दाखल होते, पैकी ११४ गुन्हे उघड करण्यास पोलिसांना यश आले असून, त्याचे प्रमाण १०० टक्के आहे. दुखापतीचे ३७४ गुन्हे दाखल करण्यात आले होते. हे सर्व गुन्हे उघड झाले आहेत. अपघातात निधन झालेल्याचे २४८ गुन्हे घडले होते त्यापैकी २२४ उघड झाले. इतर ७९२ गुन्हे दाखल झाले होते त्यापैकी ७४४ उघड झाले. जुगाराचे ११८ गुन्हे दाखल करण्यात आले होते. ते सर्व उघड झाले. दारू बंदीचे १०५९ गुन्हे दखल करण्यात आले होते. २०२४ या वर्षात अपहरणाचे १३० गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी १२५ गुन्हे उघउ झाले. ९७ मुली तर ३५ मुलांचे अपहरण करण्यात आले होते. अपहरण करण्यात आलेल्या ७ मुलीं अजून सापडलेल्या नाहीत.

२०२४ मध्ये ११८ जुगार अड्यांवर कारवाई करून ५६ लाख ५४० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला . दारूबंदीच्या १०५९ कारवाया करून ८४ लाख ५५ हजार ५८५ रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला . अंमली पदार्थ विरोधी २२ कारवाया केल्या. त्यात १८ लाख ८९ हजार ६२० रुपये किमतीचा ४.१९७ किग्रॅ. वजनाचा चरस, ८ लाख ६६ हजार ८४२ हजार रुपये किमतीचा ३४.६५२ कि.ग्र. गांजा जप्त करण्यात आला. २०२४ साली गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ९९ टक्के आहे. मागील वर्षी हे प्रमाण ८६ टक्के होते.

रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात गुन्ह्यांचे प्रामण वाढत आहे. खुनाच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. महिलांबाबतेच गुन्हे दरवर्षी वाढत आहेत. अल्पवयीन मुलींवर होणार अत्याच वाढले आहेत. गुन्हे उघड करण्याचे प्रमाण वाढले असले तरी शाबित करण्याचे प्रमाण मात्र घटले आहे. २०२३ मध्ये गुन्हे शाबित करण्याचे प्रमाण ६४ टक्के होते. २०२४ मध्ये हे प्रमाण ५६ टक्क्यांवर घसरले आहे. गुन्हे शाबित नहोण्याचे कारण म्हणजे योग्य पुरावे नसणे. पुरावे नसल्यामुळे गुन्हे शाबित करण्यात अडचणी येतात. शाबित झाले तरच आरोपींना शिक्षा होते. गुन्हगारांवर जरब बसविण्यासाठी गुंन्हे शाबित होऊन त्यांना शिक्षा झाली पाहिजे. याबात रायगड पोलीसांनी विचार केला पाहिजे.



**रोहा : वरसे गावातील एका अल्पवयीन मुलीसोबत गैरप्रकार घडल्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यात जाऊन आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी पोलीस अधिकाऱ्यांकडे केली.**



## बदलते तंत्रज्ञान

# तुमचा स्मार्टफोन गरम होतो का? बॅटरी खराब होऊ शकते

तुमचा स्मार्टफोन गरम होत असेल तर होऊ शकते नुकसान. हो. हे सत्य असून यामुळे तुमच्या फोनची बॅटरी देखील खराब होऊ शकते. यामुळे तुमचा फोन स्लो चालू शकतो. अनेकदा स्मार्टफोनमध्ये ओव्हरहीटिंगची समस्या उद्भवते. स्मार्टफोन जास्त गरम होण्यामागे अनेक कारणं असू शकतात. जेव्हा फोन जास्त वापरला जातो तेव्हा त्या परिस्थितीत तो ओव्हरहीट होतो. जेव्हा फोन जास्त प्रोसेसिंग करतो, तेव्हा तो त्या अवस्थेत गरम होतो. फोनमध्ये जास्त गेमिंग केल्यास किंवा व्हिडिओ स्ट्रीमिंग केल्यास स्मार्टफोन गरम होतो किंवा इतर कोणत्याही थर्ड पार्टी ॲपचा वापर केल्यास फोन गरम होऊ शकतो. बॅटरीमध्ये बिघाड झाल्यामुळे फोन गरम ही होऊ शकतो.याशिवाय फोनच्या कव्हरमुळे हीटिंगही होऊ शकते, कारण निकृष्ट दर्जाच्या कव्हरमुळे गरम हवा आतून बाहेर येत नाही, ज्यामुळे फोनची उष्णता वाढू शकते.






ओव्हरहीटिंगमुळे फोनची बॅटरी खराब होऊ शकते. त्याच फोनच्या प्रोसेसिंग पॉवरवर परिणाम होऊ शकतो. म्हणजे फोनचा स्पीड स्लो होतो. तसेच फोनची मेमरी खराब होऊ शकते. स्मार्टफोनचे ओव्हरहीटिंग रोखण्यासाठी 'या' गोष्टी करा फोनसोबत नेहमी ओरिजिनल चार्जरचा वापर करा.फोन थेट सूर्यप्रकाशात किंवा उबदार ठिकाणी ठेवू नये.गरज नसल्यास फोनचे बॅकग्राऊंड ॲप बंद करावे.फोन १०० टक्के चार्ज झाल्यानंतर तो चार्जरमधून काढून टाकावा. जर फोन जास्त गरम झाला तर फोन वापरणे काही काळ थांबवावे.तुमच्या फोनचे सॉफ्टवेअर नेहमी अपडेट ठेवा. जर तुम्ही फोनचे कव्हर वापरत असाल तर नेहमी चांगल्या दर्जाचे स्मार्टफोन कव्हर वापरा. तुमच्या सर्व प्रयत्नांनंतर जर स्मार्टफोन ओव्हरहीट होत असेल तर तुम्ही तुमचा फोन सर्व्हिस सेंटरला दाखवावा, कारण तुमच्या स्मार्टफोनमधील हार्डवेअरच्या कोणत्याही समस्येमुळे ओव्हरहीटिंग देखील होऊ शकते.

ओव्हरहीटिंगमुळे फोनची बॅटरी खराब होऊ शकते. त्याच फोनच्या प्रोसेसिंग पॉवरवर परिणाम होऊ शकतो. म्हणजे फोनचा स्पीड स्लो होतो. त्यामुळे आम्ही वर दिलेल्या गोष्टी तुम्ही पाळल्यास कोणतंही नुकसान होणार नाही.

# इतिहास संशोधक गणेश खरे

## निमित्त



महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध इतिहास-संशोधक. पनवेल येथे जन्म. शालेय शिक्षण पनवेल, बेळगाव येथे झाले. माध्यमिक शिक्षण द्रविड हायस्कूल, वाई येथे झाले. १९२० साली मॅट्रिक झाल्यावर त्यांनी सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयात प्रवेश घेतला (१९२०); तथापि महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडून असहकाराच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला.

असहकारितेच्या तत्त्वाप्रमाणे जामीन द्यायचे नाकारल्याने त्यांना १२ ऑगस्ट १९२२ पासून १ वर्ष बंदीवासाची शिक्षा देण्यात आली. बंदीवासातून सुटका झाल्यावर (१९२३) खरे ह्यांनी सातारा जिल्ह्या काँग्रेसचे एक चिटणीस म्हणून वर्षभर काम केले. १९२४ च्या उत्तरार्धापासून १९२९ च्या प्रारंभापर्यंत साताऱ्याच्या राष्ट्रीय शाळेत शिक्षक म्हणून त्यांनी नोकरी केली. बा. ज. शिंदे यांच्या समवेत मद्यपाननिरोधन, कोर्ट बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण यांसारख्या चळवळींचा जावळी तालुक्यात त्यांनी प्रचार केला; तसेच कोयना धरण योजनेविरुद्ध लोकजागृती केली. पुढे १९२९ मध्ये इतिहासाच्या अभ्यास-संशोधनासाठी ते पुण्यास भारत इतिहास संशोधक मंडळात गेले व तेथेच स्थायिक झाले. निवृत्तीपूर्वी मंडळाचे ते चिटणीस व अभिरक्षक होते (१९७३). १९७४ मध्ये त्यांची भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून निवड झाली. पुणे विद्यापीठाने त्यांची डॉक्टरेटसाठी मार्गदर्शक व परीक्षक म्हणून नियुक्ती केली.

इतिहासाचा सर्वांगीण अभ्यास आणि संशोधन करता यावे, म्हणून त्यांनी हिंदी, उर्दू, फार्सी, कन्नड, संस्कृत, इंग्रजी वगैरे भाषांचा सखोल अभ्यास केला; तसेच इतिहासाशी संबंधित अशा नाणकशास्त्र, पुरातत्त्वविद्या, मूर्तिविज्ञान, पुरालेखविद्या यांचा अभ्यास केला. सर्व भारतभर प्रवास करून त्यांनी शेकडो ऐतिहासिक स्थळे तर पाहिलीच; पण नाणी, कागदपत्रे, पोथ्या व इतर ऐतिहासिक वस्तू जमा केल्या. सु. तीस इतिहासप्रसिद्ध घराण्यांचे कागद, २०,००० पोथ्या, ५,००० नाणी, ८० चित्रे, ३० ताम्रशासने व २०० इतर वस्तू एवढे प्रचंड साहित्य त्यांनी जमा केले. या सर्वांचा उपयोग सामान्य

विद्यार्थ्याला तसेच चिकित्सक संशोधकाला व्हावा, म्हणून त्यांवर त्यांनी सु. ४०० लेख आणि पन्नासहून अधिक लहान-मोठी पुस्तके लिहिली. दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, (३ खंड – १९३०, ३४, ४९), मूर्तिविज्ञान (१९३९), संशोधकांचा मित्र (१९५१), महाराष्ट्राची चार दैवते (१९५८) ही त्यांची मान्यवर व प्रसिद्ध पुस्तके उल्लेखनीय आहेत.

अखिल भारतीय नाणक-परिषदेचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले (१९७४). तसेच त्यांचा एक गौरवग्रंथही प्रसिद्ध झाला आहे (१९७५). पुणे विद्यापीठाकडून सन्माननीय डी. लिट्. पदवी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला (१९८४). महाराष्ट्रात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी निष्ठावंत इतिहाससंशोधकांची जी परंपरा निर्माण केली, त्याच परंपरेत खरे मोडतात. इतिहास संशोधनाला जीवन सर्वस्व वाहणारे खरे यांचकार्य मौलिक आहे.पुणे येथे त्यांचे निधन झाले.

## बातमीतील बात





## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात संत्री सेवनाचे आरोग्यदायी फायदे

हिवाळ्यात रस्त्यावर दिसणारे संत्र्याचे ढीग बघितले की एखादं तरी संत्र खाण्याचा मोह प्रत्येकाला होतोच. आजकाल संत्री वर्षभर उपलब्ध असली तरी हिवाळ्यातली हंगामी संत्र्यांची चव काही औरच असते. संत्रं चवीला आंबट गोड असतं, पण फार आंबट असणारं संत्र आरोग्यासाठी तितकसं चांगलं नाही त्यामुळे संत्र गोड असल्याची खात्री करूनच खावं. संत्रं हे शरीरातील रस धातूचं तत्काल म्हणजे अगदी लगेचंच पोषण करणारं असतं.



गोड संत्र हृद्य म्हणजे हृदयाला आणि रक्तवाहिन्यांना पोषक असतं. त्यामुळे हिवाळ्यात चांगली संत्री मिळतात, तेव्हा एक किंवा दोन संत्र्याचा रस काढून त्यात चमचाभर मध मिसळून घेणं चांगलं असतं. सकाळी नाश्ता नंतर किंवा अकरा- साडे अकराच्या सुमाराला हा रस घेता येतो. आंबट गोड चवीमुळे संत्रं चव वाढवणारं असतं, अन्न खाण्याची इच्छा नसेल तेव्हा संत्र्याच्या ताज्या रसात थोडसं सैंधव, काळी मिरी आणि ओव्याचं चूर्ण मिसळून, घोट घोट घेण्यानी बरं वाटतं.

गर्भवती स्त्रीला पहिल्या तीन महिन्यात मळमळतं, उलट्या होतात, अशा वेळेला संत्र्याच्या फोडींवर लवंगाचं चूर्ण भुरभुरून खाण्यानी बरं वाटतं. ज्या स्त्रियांना जास्त प्रमाणात रक्तस्त्राव होतं, रस-रक्त धातूच्या क्षीणतेमुळे चिडचिड होते, अशक्तता जाणवते, छातीत धडधड होते, त्यांना दोन संत्र्यांचा रस, त्यात खडीसाखर आणि सैंधव मिसळून घेण्याचा उपयोग होतो. संत्र्याची साल जंतुघ्न असते.

त्यामुळे केस धुण्यासाठी शिकेकाई, रिठा, आवळा वगैरे द्रव्यांपासून बनवलेल्या पारंपारिक मिश्रणात सुकवलेली संत्र्याची साल हमखास मिसळलेली असते. जर जखम पटकन बरे होत नसेल, जखमेत पू निर्मिती झालं असेल, उग्र वास जाणवत असेल तर संत्र्याची साल बारीक करून तयार केलेली पेस्ट जखमेवर बांधून ठेवण्यानी जखम शुद्ध होते आणि लवकर भरून यायला मदत मिळते.

आजारी व्यक्तीला बघायला जायची वेळ आली तर आपण सहसा संत्री- मोसंबी घेऊन जातो. प्रतिजैविक, केमोथेरपी, रेडिएशनमुळे शरीरात साठून राहणारी विषद्रव्य शरीराबाहेर निघून जावीत यासाठी खरोखरच संत्र्या मोसंबीचा रस उपयोगी असतो. फक्त यासाठी ती गोड हवीत. साखर टाकून गोड केलेला रस पिण्याचा काही उपयोग नाही हे सुद्धा लक्षात ठेवायला हवं. फळांचा रस काढला की तो लगेच म्हणजे लवकरात लवकर प्यावा. फार वेळ ठेवून देऊ नये.

# वीर यशवंतराव घाडगे यांचा गौरवशाली इतिहास भावी पिढीपर्यंत पोहचवा : मंत्री आदिती तटकरे

## व्हिक्टोरीया क्रॉस विजेते शहीद घाडगे यांची जयंती साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

शहीद वीर यशवंतराव घाडगे यांचा गौरवशाली इतिहास आजच्या भावी पिढीपर्यंत पोहचला पाहिजे असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी वीर घाडगे यांच्या माणगाव येथील जयंती समारंभात बोलताना व्यक्त केले.





शहीद वीर यशवंतराव घाडगे व्हिक्टोरीया क्रॉस मानचिन्ह धारक (मरणोत्तर) यांचा जयंती समारंभ गुरुवार दि. ९ जानेवारी रोजी प्रांत कार्यालयाचे परिसरात सकाळी मोठ्या उत्साहात पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी घाडगे उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माणगाव प्रांताधिकारी डॉ. संदीपान सानप तर प्रमुख अतिथी म्हणून कर्नल किशोरकुमार मोरे उपस्थित होते. उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी,घाडगे उत्सव समितीचे सचिव तहसीलदार दशरथ काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, सामाजिक कार्यकर्ते संजयअण्णा साबळे,वीर यशवंतराव यांचे वारसदार सुभाष घाडगे, नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, माजी सैनिक संघटना अध्यक्ष सहादेव खैरे, माजी अध्यक्ष विष्णू सावंत,पोलादपूर माजी सैनिक संघटना अध्यक्ष वाय.सी.जाधव, उपनगराध्यक्ष हर्षदा काळे, नगरपंचायत महिला व बालकल्याण समिती सभापती सुविधा खैरे, नगरसेविका लक्ष्मी हिलम, माजी नगराध्यक्ष योगिता चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, नगरसेवक नितीन वाढवळ, आरोही सुर्वे आजी-माजी सैनिक, पोलीस अधिकारी, कर्मचारी, विविध शाळांचे शिक्षकवर्ग, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी व्हिक्टोरिया क्रॉस विजेते शहीद वीर यशवंतराव घाडगे यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली.यावेळी ना. आदिती तटकरे यांनी माजी सैनिकांच्या बंद असलेल्या विश्रामगृहासाठी निधीची तरतूद करून लवकरच चालू करण्यात येईल असे आश्वासित करुन विश्रामगृहामध्ये वीर मरण आलेल्या सैनिकांची माहिती दिल्यास ती माहिती भावी पिढीला मार्गदर्शक ठरेल असे सांगितले. यावेळी वीर यशवंतराव घाडगे यांच्या वीर पत्नींची उणीव या समारंभाच्या निमित्ताने भासत आहे. दरवर्षी या समारंभाला त्या आवर्जून येत असत. एक वर्ष त्यांच्या अंगात भरपूर ताप असतानाही त्या समारंभास उपस्थित होत्या. दोन वर्षांपूर्वी त्यांचे निधन झाले. आपल्या पतीला वीर मरण आल्यावर गेली अनेक वर्ष त्याचे दुःख मनात ठेवत त्या समारंभास येत असत. वीर घाडगे यांच्या वीर शौर्याची गाथा वर्तमान पिढीतील लोकांपेक्षा भावी पिढीपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. यासाठी पुढील वर्षी होणार वीर यशवंतराव घाडगे यांच्या जयंती समारंभास माणगाव शहरातील सर्व शाळांचे विद्यार्थी तसेच तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांना बोलविल्यास ही शौर्याची गाथा भावी पिढीपर्यंत पोहचून हा समारंभ अधिक मोठ्या प्रमाणात आपल्याला साजरा करता येईल, असे ना.तटकरे यांनी सांगितले.

या वेळी कर्नल किशोर कुमार मोरे, वाय.सी.जाधव, सहादेव खैरे यांनी शहीद वीर यशवंतराव घाडगे यांच्या अतुलनीय शौर्याची माहिती दिली.

---

## लोखंडी सळईने हल्ला; आरोपीवर गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

लोखंडी सळई खांद्याला मारून दुखापत करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना माणगाव शहरात दि. ७ जानेवारी रोजी घडली आहे.याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सिताराम टेंबे दोन वर्षापासुन अण्णा साबळे यांचे बांधकाम सुरु असलेल्या इमारतीचे काम करुन शेजारील शेडमध्ये राहतात. ७ जानेवारी रोजी ५.३० वा. च्या सुमारास राहत्या ठिकाणी जनावर किंवा साप येवू नये याकरिता शेडलगतचे जागेमध्ये वाढलेले गवत काढत असताना आरोपी गोविंद पवार याने टेंबे यांना जवळ बोलावुन त्यांचे कानाखाली जोरात चापट मारली.

त्यावेळी टेंबे यांनी मला काही कारण नसताना का मारलत असे आरोपीला विचारले असता, या गोष्टीचा आरोपी पवार यांना राग आल्याने त्याने शेजारी गॅरेज मधील लोखंडी सळई घेवून टेंबे यांचे डाव्या खांदयाला जोरात मारुन दुखापत केली तसेच टेंबे हे उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे उपचाराकरिता गेले असताना त्या ठिकाणी आरोपी पवारने येउन टेंबे यांना माझ्या विरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिलीस तर तुला बघुन घेतो म्हणुन ठार मारण्याची धमकी दिली. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पो. नि. निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह. सानप करीत आहेत.

## अलिबाग पोलीस ठाण्यावर शिवसेनेचा मूक मोर्चा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा शिवसेनेतर्फे गुरुवारी (दि ९) अलिबाग पोलीस ठाण्यावर मूक मोर्चा काढण्यात आला.अलिबाग तालुक्यातील वायशेत येथे घराच्या वादातून महिलेला मारहाण करणाऱ्या आरोपीवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता.उपविभागीय पोलीस अधिकारी विनित चौधरी यांना निवेदन देण्यात आले.

शिवसेनेच्या मध्य रायगड जिल्हा महिला संपर्क प्रमुख संजीवनी नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला होता. अलिबाग वायशेत सायमन कॉलनी येथील घराबाबत आरोपीच्या आई सोबत हाशिम मन्सूरी यांचा वाद आहे. हाशिम यांच्या पत्नीने अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार देखील केली. याचा राग मनात धरून आरोपीने हाशिमवर हल्ला केला. हाशिम मन्सूरी उपचाराकरीता सिव्हील हॉस्पीटमध्ये दाखल करण्यात आले. आरोपीने हासिम मन्सुरी यांची पत्नी अमीना यांच्यावर देखील हल्ला केला. याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवसेनेच्या मध्य रायगड जिल्हा महिला संपर्क प्रमुख संजीवनी नाईक यांच्या नेतृत्वाखाली मूक मोर्चा काढण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. महिलेस मारहाण करणारी व्यक्तीही गुन्हेगारी पार्श्वभूमीची आहे. त्यामुळे सदर आरोपीला कठोर शासन होणे आवश्यक आहे असे निवेदनात म्हटले आहे.



---

## चौक ग्रंथालयाला १०४ वर्षे पूर्ण; वाचन संस्कृती जोपासण्याचा संकल्प

**चौक : प्रतिनिधी**

लोकमान्य टिळक मोफत वाचनालय,चौकला १०४ वर्ष पुर्ण झाली, त्यामुळे चौक परीसरात वाचन संस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्न होत असल्याचे दिसून येते.

वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणाच्या व्यक्तीमत्वाचे भरणपोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते परंतु अलीकडच्या काळात देशाचा तरुण वाचक संस्कृती पासून दुरावत चाललेला असल्याने आढळून येते, तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याची आवश्यकता आहे.त्या दृष्टीने सार्वजनिक ग्रंथालयाच्या माध्यमातुन विद्यार्थी, विद्यार्थीनी यांच्या बरोबर वाचन प्रेमी यांची वाचन संस्कृती वाढविण्याकरिता,वाचन चळवळ वृद्धिगत करण्याकरिता,वाचन चळवळीचा प्रचार व प्रसार करण्याकरिता कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

चौक येथिल लोकमान्य टिळक सार्वजनिक मोफत वाचनालयाला १०४ वर्षे पुर्ण झाली.त्या निमीत्त पुस्तक ओळख, पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे,रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना या उपक्रमामध्ये सामावून घेतले आणि त्यांनी विविध विषयावर मांडणी केलेल्या ग्रंथांचे वाचन केले

सोबत बाल विभागातील पुस्तके प्रदर्शनासाठी मांडण्यात आली होती. मुख्याध्यापक नाईक,पठाण व शिक्षक वृंद यांनी सहकार्य केले. साने गुरुजी यांची प्रार्थनेचे सामुहिक वाचन सर्वांनी करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



---

## मंत्री आदिती तटकरेंनी घेतली डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारींची भेट

**रेवदंडा : प्रतिनिधी**

राज्याच्या महिला व बाल कल्याण मंत्री आदितीताई तटकरे यांनी नुकतीच जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची भेट रेवदंडा येथील त्यांच्या निवासस्थानी घेतली.

रेवदंडा येथे आदितीताई तटकरे ठिक साडेअकराचे सुमारास पोहचल्या त्याचे समवेत रा.कॉ. जिल्हा सचिव आशिष भट, व किहीम ग्रामपंचायत सरपंच प्रसाद उर्फ पिंटया गायकवाड उपस्थित होते. आप्पासाहेबांनी मंत्री आदितीताई तटकरे यांचे स्वागत केले,यावेळी निरूपणकार सचिनदादा धर्माधिकारी यांची सुध्दा उपस्थिती होती.



आदितीताई तटकरे यांनी जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डाँ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना पुष्पगुच्छ प्रदान केले व त्यांचे शुभ आशिर्वाद घेतले. त्यानंतर आदितीताई यांनी खुप वेळ आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे समवेत घालविला. रेवदंडा येथून प्रस्थान करण्यापुर्वी मंत्री आदितीताई तटकरे यांनी रेवदंडा पारनाका येथील श्री मारुतीरायाचे दर्शनाचा लाभ घेतला.

---


### जाहीर नोटीस

जाहीर सुचना देण्यात येत आहे की, माझे अशिल यांनी अंदाजे ११५० चौ. मि. चा भूखंड की जो सिडको लि. कडुन मौजे जे.एन.पी.टी. नोड., ता. उरण, जि. रायगड, येथे इरादित / वाटप होणार आहे, तो खरेदी करण्याचा विचार करत आहेत. हा सदरचा भूखंड ज्यांना वाटप होणार आहे त्यांची नावे अशी आहेत, १. श्री.गणेश धर्मा घरत, २. श्रीमती. जनाबाई शंकर पाटील, ३. श्रीमती. हिरावती हरिश्चंद्र भोईर, ४. श्री. सुनिल वामन घरत, ५. श्रीमती. रमाबाई कमलाकर म्हात्रे, ६. श्रीमती. बेबीबाई दामोदर म्हात्रे, ७. श्री. दत्तात्रेय पदमाकर घरत, ८. श्री. रमेश पदमाकर घरत, ९. श्री. राजेंद्र पदमाकर घरत, १०. श्रीमती. ताराबाई किसन घरत, ११. श्रीमती. वंदना बाबुराव भोईर, १२. रणजीत जनार्दन घरत, १३ श्रीमती दिपाली महेंद्र घरत, १४. श्री. द्वेष महेंद्र घरत, १५. कु. रोनक महेंद्र घरत (अज्ञान पालनकर्त्ता तर्फे आई श्रीमती. दिपाली महेंद्र घरत), १६. श्रीमती. जागृती मोतीराम घरत, १७. श्रीमती. मानकूबाई महादेव घरत, १८. श्रीमती लिलूबाई प्रल्हाद म्हात्रे, १९. श्रीमती. चंद्रभागा प्रतिक घरत, साधारण सर्व राहणार उरण तालुक्यात, जि. रायगड, यांना हे भूखंड वाटप महाराष्ट्र शासनाने जेएनपीटी प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात असुन ते १२.५ टक्के गावठाण विस्तार योजनेअंतर्गत इरादित / वाटप होणार आहेत. सदर संपादीत जमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**संपादित जमीनीचे वर्णन**
**मौजे शेवे, तालुका उरण, जिल्हा रायगड**

| गावाचे नाव/अवॉर्ड युनिट केस नं. | सर्वे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | ॲवार्डधारक / प्रकल्पधारक |
|---|---|---|---|
| शेवे २४१ (I) | ४०/१ | ०-२-० | कै. भास्कर पांडु घरत व कै.धर्मा पांडु घरत व इतर |
| | ४७/१२ | ०-१५-० | |
| | ५२/४ | ०-१-० | |
| | ५३/३२ | ०-२-८ | |
| शेवे २४१ (II) | ५७/२ | ०-१-० | |
| | ६१/४ | ०-८-० | |
| | ८९/१ | ०-१९-० | |
| | ९१/३ | ०-१-८ | |
| | १०२/३ | ०-६-६ | |
| | ४/१५ | ०-६-० | कै. भास्कर पांडु घरत व कै. धर्मा पांडु घरत व इतर |
| शेवे २४२ (I) | २६/१२ | ०-३-७ | |
| | १९१/३१ | ०-७-० | |
| शेवे २४२ (II) | १२/१९सी | ०-२९-० | |
| | १८/१ | ०-१०-० | |
| | ३३/४ | ०-१०-० | |
| शेवे २४२ | ३३/४ पी.टी | ०-२-० | |
| शेवे २४२ (III) | ९/२ | ०-२-३ | |
| | २३/२ | ०-२-० | |
| | २८/४ | ०-१-५ | |
| | ४७/९ | ०-५-० | |
| | ४९/२ | ०-८-३ | |
| | ४९/५ | ०-२-३ | |
| | ५०/२७ | ०-०-२ | |

कोणाही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर संपादीत केलेल्या जमिनी / सदर भूखंडासाठी किंवा त्यावर त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, लिअन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्टयर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सूचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरूप यांची माहीती अन्य तपशीलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत सादर करावी, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर भूखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातुन आणि अन्य हक्कापासुन आणि अधिकारापासुन किंवा अन्य प्रकारच्या बंधनापासुन मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडुन देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि माझे अशिल कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता सदर भूखंड खरेदी करण्याच्या दृष्टीने दिलेली मुदत संपल्यानंतर कार्यवाही करेल.

**दिनांक : ०९/०१/२०२५**

सही/-
**ॲड. कालिदास सु. पोटे**
वकील उच्च न्यायालय
कार्या-नं. ३४, तळमजला, वेल्फेअर चेंबर, भूखंड नं. ७३, सेक्टर-१७, वाशी, नवी मुंबई-४००७०३. मो. नं. ९८३३५२५१५१



### जाहीर नोटीस

रायगड जिल्हा सहकारी वाहतूक संस्था मर्यादित अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड या संस्थेचा मतदार यादी निश्चितीचा कार्यक्रम सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अलिबाग या कार्यालयाने दिनांक ०७/०१/२०२५ रोजी प्रसिद्ध केला आहे. या संस्थेची प्रारूप मतदार यादी दिनांक ०८/०१/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रारूप मतदार यादीवर काही आक्षेप असल्यास आपण दिनांक ०८/०१/२०२५ ते १५/०१/२०२५ पर्यंत सभासदास हरकत असल्यास सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अलिबाग, पहिला मजला, ब्राम्हण उत्कर्ष मंडळ इमारत, ब्राम्हण आळी, अलिबाग, रायगड येथे दाखल करावी.

**दिनांक : ०९/०१/२०२५**

**सही/- सचिव** | **सही/- खजिदार** | **सही/- अध्यक्ष**

रायगड जिल्हा सहकारी वाहतुक संस्था
मर्या. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-उसर्ली बुद्रुक, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ६६/२ | ०-१४-०० | ०.२८ | **श्री. अशोक लक्ष्मण लवाटे, श्री. शशांक शांताराम महाराज** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०९/०१/२०२५**

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-शिवकर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ३३९/१ | ०-०५-३० पो. ख. ०-००-३० **एकूण ०-०५-६०** | १.१९ | **श्री. नामदेव गणपत विभार** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०९/०१/२०२५**

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१



### कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- kbmc123@gmail.com वेबसाईट :- http://kbmc.gov.in

**संदर्भ. कु.ब.न.प/आरोग्य/१९७/२०२४-२०२५** **दिनांक : ०९/०१/२०२५**

**जाहीर निविदा सूचना**
**शहर स्वच्छता विभाग सन २०२४-२०२५**

कुळगाव बदलापूर नगरपरिषद जिल्हा- ठाणे यांजकडून खालील कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | निविदा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | कुळगाव बदलापूर नगरपरिषदेचे शहर स्वच्छता विभागाकरिता स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० व माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे. | १०,०००/- | १०००/- | ८ महीने किंवा सर्वेक्षण कालावधी पूर्ण होईपर्यंत |

सही/-
**मुख्याधिकारी**
**कुळगाव बदलापूर नगरपरिषद**

निवडक



## रेझिंग डे सप्ताहानिमित्त मेळावा

**पनवेल :** पोलीस रेझिंग डे सप्ताह अंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाणे येथे महिला दक्षता कमिटी सदस्य व पोलीस पाटील यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी वपोनि नितीन ठाकरे यांनी विविध विषयावर चर्चा तसेच मार्गदर्शन केले. या वेळी पो.नि.पठाण व पो. नि.अभंग यांच्यासह ३० ते ३५ सदस्य व गोपनीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## फडके नाट्यगृहात स्नेहसंमेलन



**कळंबोली :** येथील न्यू मुंबई इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन पनवेल मधील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या जल्लोषात पार पडले. संस्थेचे अध्यक्ष संतोष बैजनाथ शुक्ला यांनी या स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. उद्घाटन नवी मुंबई आरएसपीचे समादेशक विलास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी खारघरमधील बोनी स्कूलचे संस्थापक अध्यक्ष सुनील बंधू, सामाजिक कार्यकर्त्या अर्चना तोमर उपस्थित होते. तसेच विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने या स्नेहसंमेलनात सहभागी झाले होते.

## शाळेची ऑक्सिजन पार्कला भेट



**उरण :** चिरनेर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या चांदायली आदिवासीवाडीवरील प्रार्थमिक शाळेची सारडे कोमनादेवी ऑक्सिजन पार्कला भेट देण्यात आली. मुलांनी निसर्गाच्या सानिध्यात राहून, पार्कमधील विविध झाडांची रोपट्यांची माहिती घेतली. सर्व विद्यार्थ्यांना सारडे विकास मंच तर्फे सावा वॉटर प्युरिफायरची बॅग भेट देण्यात आल्या. या वेळी दोस्ती ग्रुपचे हरिश्चंद्र म्हात्रे, मुख्याध्यापक प्रवीण पाटील, शिक्षिका प्रतिभा लहासे, अश्विनी कातकरी, सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे उपस्थित होते.

## अरिन फाउंडेशनला पुरस्कार



**नवी मुंबई :** नवी मुंबई आरिन फाउंडेशनला नवी मुंबई महापालिकेच्या वतीने २०२३-२४ चा मानाचा क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार महिला आणि मुलांसाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते व आमदार मंदा म्हात्र यांच्या उपस्थितीत वाशी येथे प्रदान करण्यात आला. या वेळी फाउंडेशनचे नितेश मिसाळ, रेखा अभंग, प्रणाली मिसाळ, नीलम धुमाळे, रेखा साळुंखे, गीता राठोड, राधिका धुमाळ, शितल पवार, प्रियंका वाघचौरे व सदस्य उपस्थित होते.

## विद्याभवनमध्ये रेझिंग डे

**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्यार्थी



भवन शिक्षण संकुलात पोलीस स्थापना दिवसानिमित्त नेरूळ येथील पोलिसांकडून जनजागृती करण्यात आली. नेरूळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज धाडगे, संजय लाड आणि सुनील चौधरी यांनी विद्यार्थी व शिक्षकांना सावध व सतर्क राहून फसवणूक टाळण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ मुख्याध्यापिका श्रीजा नायर तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# उरणमध्ये बेशिस्त वाहनचालकांकडून वर्षभरात पावणे चार कोटींचा दंड वसूल

**उरण : प्रतिनिधी**

उरण वाहतूक शाखेच्या वतीने रहदारीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्याचे उद्देशाने तसेच वाहन अपघातांना आळा घालण्यासाठी मागील वर्षी २०२४ जानेवारी ते डिसेंबर आत्तापर्यंत मोटर वाहन कायद्याखाली एकूण ४५ हजार ४६८ वाहन चालकाविरुद्ध विविध कलमाखाली दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.



वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित वाहन चालकांना एकूण तीन कोटी ८० लाख ८५ हजार ९५० एवढ्या रकमेचा दंड आकारण्यात आला. सदर दंडा पैकी एकूण २७ लाख ११ हजार ६०० रुपये इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे.

कारवाई अंतर्गत रस्त्यावर चुकीच्या ठिकाणी वाहने पार करून रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर २० हजार ८१३ कारवाई करण्यात आल्या , विदाऊट हेल्मेट दुचाकी वाहन

### ४५ हजार ४६८ जणांवर कारवाई

चालवणाऱ्या चालकाविरुद्ध४ हजार ७४१, वाहन चालविताना सीट बेल्ट न वापरलेल्या वाहन चालकाविरुद्ध १२ हजार ३१९ कारवाई करण्यात आल्या तसेच ड्रिंक अँड ड्राईव्ह च्या वाहन चालकाविरुद्ध १३२ दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर तसेच पोलीस रेजिंग डे व रस्ता सुरक्षा अभियानाच्या अनुषंगाने उरण वाहतूक शाखेच्या वतीने संपूर्ण उरण शहर व द्रोणागिरी, नवघर, भेडखळ परिसरात प्रभोधन पर कार्यक्रम व विशेष नाकाबंदी व तपासणी मोहीम आखण्यात आली.

दंडात्मक कारवाई सोबतच त्यांचे वाहन जप्ती अथवा वाहन परवाना निलंबन कारवाई करण्यात येईल. उरण शहर परिसरातील वाहन चालकांनी महामार्ग तसेच अंतर्गत रस्त्यावर वाहने चालवताना स्वतःचे व इतरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मोटर वाहन कायद्याचे पालन करावे, असे आवाहन उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी केले आहे.

## वाढत्या चोऱ्यांवर प्रभावी उपाययोजना करा

### दर्शना भोईर यांची पोलिसांकडे मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील वाढत्या चोऱ्यांवर प्रभावी उपाययोजना करावी, अशी मागणी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांना निवेदन दिले आहे.

भोईर यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल शहर व परिसरात मागील अनेक दिवसांपासून चोऱ्यांचे प्रमाण खूप वाढलेले असून, रिक्षांची चोरी, महिलांच्या दागिन्यांची चोर, मोबाईल चोरी असे अनेक प्रकार शहरात वाढीस लागलेले असून यामुळे शहरातील नागरिक खूप भयभीत झालेले आहेत. या चोऱ्यांना आळा घालण्याकरीता प्रभावी योजना करण्याच्या अनुषंगाने रात्रीच्या वेळेस पेट्रोलींगचे प्रमाण वाढविण्यात यावे व इतर अनुषंगीक आवश्यक त्या उपायोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

पनवेल शहर पसिरातील वाढत्या चोऱ्यांच्या घटनांवर आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करून या परिसरातील भयभीत नागरिकांना दिलासा देण्यात यावा.

## १३ जानेवारीला लोकशाही दिन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार १३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कोकण विभागाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजीव पलांडे यांनी कळविले आहे.

दरम्यान, विभागीय लोकशाही दिन दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी नियोजित केला जातो.

## नेरूळ, वाशीत नेत्र तपासणी शिबिर

### परिवहन विभागाकडून वाहनचालकांसाठी उपक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय नवी मुंबई, आयोजित राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२५ परवाह अंतर्गत नेत्र तपासणी शिबिर व आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर ७ ते १० जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये नेरूळ येथील वाहन तपासणी केंद्र व वाशी येथील मैदानी चाचणी केंद्र येथे होत असून शिबिरास वाहन चालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

शिबिराचा लाभ हा वाहन तपासणी केंद्रावरील शेकडो वाहन चालकांना मिळत आहे. तसेच नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमातील ६० वाहन चालकांनी तर १०० अधिक रिक्षा, अवजड वाहन चालकांनी शिबिरात आपले आरोग्य व नेत्र तपासणी केली. त्याचबरोबर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सांगोलकर यांनी नेत्र तपासणी दरम्यान दोष आढळणाऱ्या वाहनचालकांना कार्यालयामार्फत मोफत चष्मा वाटप केले आहे.

शिबिरास श्री सत्य साई बुक्स अँड पब्लिकेशन्स ट्रस्ट व रामकृष्ण नेत्रालय अँड केअर यांनी मोफत वैद्यकीय तपासणी व चष्मा वाटप यास मोलाचे सहकार्य केले.

शिबिरास सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे यांनी रस्ता सुरक्षा विषयावर उपस्थित असणाऱ्या सर्व वाहक चालकांना नागरिकांना मार्गदर्शन केले. तसेच नेत्र व आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी मोटार वाहन निरीक्षक प्रशांत शिंदे, संजय चव्हाण, सुनील म्हेत्रे यांनी परिश्रम केले.

## पत्रकारांकडून मुलांना खाऊ आणि ब्लँकेट वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-नवी मुंबई प्रिंट डिजिटल पत्रकार संघ आणि श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिनानिमित्ताने खारघर-धामोळेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत आणि गावामध्ये ब्लँकेट आणि खाऊवाटप करण्यात आले.

पत्रकार दिनाचे औचित्य साधून ८ जानेवारी रोजी पत्रकार संघटनेतर्फे ब्लँकेट आणि ५० हून अधिक विद्यार्थ्यांना खाऊ वाटपाचे आयोजन धामोळेवाडी येथे करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांना खाऊवाटप केल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.



या वेळी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष मयूर तांबडे, उपाध्यक्ष समीर वेशवीकर, सचिव दीपक घरत, रमेश भोळे, दिपक जगे, रमेश भोळे, लालचंद यादव, अशोक गोरडे, दीपक कांबळे, मिलिंद खारपाटील, पंकज तांबडे तसेच प्रल्हादराय झुलेलाल टस्टचे अध्यक्ष मनोहर सचदेव, सामाजिक कार्यकर्त्या चंचला बनकर, अॅड वैशाली पंडित, नाना रणदिवे, शिक्षिका आदी उपस्थित होते.

## नील हॉस्पिटलमध्ये पत्रकारांचा सन्मान

**पनवेल :** नील हॉस्पिटलमध्ये पनवेल, उरण आणि पेण तालुक्यातील पत्रकारांना सन्मानित करण्यात आले.


कार्यक्रमास डॉ. शुभदा नील, कांदळवन अधिकारी साईश्वरी पडवळ, प्रा.डॉ भाग्यश्री भोईर, ज्ञानेश्वरबर्वे महाराज, भक्ती बर्वे, मंगला गडमुळे, उत्कर्ष समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे, मिलिंद खारपाटील, अलंकार भोईर, अशोक घरत, साईश्वरी पडवळ आणि प्रा. डॉ.भाग्यश्री भोईर, डॉ वैभव पाटील आदी उपस्थित होते. पत्रकार संजय कदम, अनिल कुरघोडे, दीपक घोसाळकर, निलेश म्हात्रे, मयूर तांबडे, सुधीर पाटील, सुनील कटेकर, धनाजी घरत, जगदीश भोईर, रणीता ठाकूर, सुजाता होळकर यांना सन्मानित करण्यात आले.



## आवरे येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालयात करिअर मार्गदर्शन

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुल आवरे, तालुका उरण, जिल्हा रायगड येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स या ठिकाणी मंगळवारी (दि.७) दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना दहावी-बारावीनंतर पुढे काय? याबाबतचे मार्गदर्शन मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष घरत यांनी केले.



या मार्गदर्शनामध्ये इयत्ता दहावी व बारावी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील- बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर कोणकोणते अभ्यासक्रम आहेत, अभ्यासक्रम प्रवेश पात्र परीक्षा कोणत्या आहेत? अनेक बाबींवर विद्यार्थ्यांना उद्बोधन केले.

या कार्यक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर, शिक्षक शरद केणी, राजेंद्र शिंदे, शिवहरी गावंड, अध्यापकवर्ग, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

## सानपाडा येथे घरफोडी

**नवी मुंबई :** सानपाडा येथे राहणाऱ्या केशव परमार हे पत्नीसह पुणे येथे राहणाऱ्या मुलीकडे गेले असताना त्यांच्या घरात चोरी झाली आहे. मंगळवारी त्यांना घराचे कुलूप अज्ञाताने तोडल्याचे शेजाऱ्यांमार्फत समजले. यामुळे त्यांनी जावयामार्फत घराची पाहणी केली असता, घरातून रोकड व दागिने, असा तीन लाख ७५ हजारांचा ऐवज चोरल्याचे समोर आले. याप्रकरणी सानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

क्लिक...क्लिक...!



**मुरुड : परिसरात पाऊस नसला तरी वारा वेगाने वाहत आहे. त्यामुळे किनारी असलेली नारळाची झाडे सोसाट्याचा वारा वाहत असताना वाकडी होतात.** (छाया : सुधीर नाझरे)

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची बँक व्हिजिट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागातर्फे बुधवारी (दि.८) महाविद्यालयातील प्रथम द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी बँक व्हिजिटचे आयोजन केले होते.

वाणिज्य शाखेतील प्रथम द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सानपाडा येथील नॅशनल को-ऑपरेटिव्ह



बँकेला भेट देऊन तेथील कर्ज विभाग, तसेच डीडी, पैसे काढण्याची प्रक्रिया, कर्जत तारण, बँकेमध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या स्कीम्स ह्या सर्व गोष्टींचा अनुभव घेतला तसेच बँकेमधील सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी बँक व्हिजिटचे आयोजन केल्याबद्दल वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या बँक व्हिजिटचे आयोजन प्रा. विशाल देशमुख यांनी केली तसेच प्रा. मनोज यादव, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. राहुल कांबळे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. डॉ. महादेव चव्हाण व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.,

# श्रीवर्धनमध्ये गुन्हेगारीत घट




**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन पोलीस ठाणे हे त्यांच्या जबाबदारीत २०२४मध्ये अत्यंत प्रभावी व कार्यक्षम कार्य करत आहेत. गेल्या एक वर्षाच्या तुलनेत या वर्षी गुन्हेगारीत १५ टक्के घट दिसून आली आहे, ज्यामुळे श्रीवर्धन पोलीस ठाणे आणि पोलीस प्रशासनाची कामगिरी खूपच प्रशंसा मिळवते आहे.

सन २०२४ मध्ये श्रीवर्धन पोलीस ठाण्याने हद्दीमध्ये विविध प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी दाखवली आहे. विविध प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये त्यांनी यशस्वीपणे आपला पाठपुरावा सुरू ठेवला असून, काही विशेष घटनांचा शोध घेतला असता.

किरकोळ गुन्हे – २५ दाखल आणि २५ उघडकीस श्रीवर्धन पोलीस ठाण्याने किरकोळ गुन्ह्यांमध्ये यशस्वी कारवाई केली असून या वर्षी २५ दाखल गुन्ह्यांमध्ये सर्वच उघडकीस आणले आहेत. दारूबंदी गुन्हे – ३५ दाखल आणि २९ उघडकीस श्रीवर्धन पोलीस ठाण्याने दारूबंदीच्या संदर्भात ८३ टक्के कामगिरी केली आहे. ३५ दाखल गुन्ह्यांमध्ये २९ गुन्हे उघडकीस आणले आहेत, यामुळे दारूबंदीच्या अंमलबजावणीसाठी पोलीस ठाण्याची कार्यक्षमता प्रदर्शित झाली आहे. खुनाचे गुन्हे – ४ दाखल गुन्हे, नवीन पेठ जागेच्या वादामुळे खून – एका भूमिहीन कुटुंबाचे नवीन पेठ येथे जागेच्या वादावरून खून झाल्याची घटना उघडकीस आली, बापवन परिसरात अनैतिक संबंधामुळे एक खून घडला.

हरिहरेश्वर येथे एका पर्यटकाने गाडी घालून एका व्यक्तीचा खून केला, हा गुन्हादेखील उघडकीस आणण्यात आला, आराठी येथील पवार यांचा खून हे चारही गुन्हे उघडकीस आणले आहेत. श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या कामगिरीचे महत्त्व लक्षात घेतल्यास त्यांनी रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यात ८९ टक्के गुन्हे उघडकीस आणले आहेत. ज्यामुळे पोलीस प्रशासनाचा मार्गदर्शन आणि कर्तव्यदक्षता सिद्ध झाली आहे.

सन २०२३ मध्ये श्रीवर्धन पोलीस ठाण्यात एकूण ५२ गुन्हे घडले होते, तर २०२४ मध्ये त्याचा आकडा ४४ पर्यंत कमी झाला आहे. यावरून १५ टक्के गुन्हेगारी कमी झाली आहे, जे एक मोठे यश आहे. पोलीस ठाण्याने आपल्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा केली आहे, आणि गुन्हेगारी नियंत्रित करण्यासाठी त्यांनी अनेक पावले उचलली आहेत.

## पोलीस ठाण्याची उल्लेखनीय कामगिरी

**जर नागरिकांना कोणतीही कायदेशीर अडचण किंवा पोलीस ठाण्याशी संबंधित समस्या उद्‌भवली, तर त्यांना तत्काळ पोलीस ठाण्यामध्ये संपर्क साधावा. पोलिसांनी प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षेसाठी काम करत आहेत आणि ते तुमच्या मदतीसाठी सदैव तयार आहेत.**

**–उत्तम रिकामे, पोलीस निरीक्षक**

### अनेक गुन्हे उघडकीस

***श्रीवर्धन पोलीस ठाण्याने २०२४मध्ये आपल्या कामगिरीने स्थानिक नागरिकांचे तसेच उच्च प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले आहे. विविध प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये यशस्वी उघडकीस आणलेली कामगिरी, दारूबंदीच्या अंमलबजावणीतील प्रगती आणि गुन्हेगारीत घट हे सर्व महत्त्वाचे यश आहेत. यामुळे श्रीवर्धन पोलीस ठाणे संपूर्ण जिल्ह्यात आदर्श ठाणे म्हणून ओळखले जात आहे.***

# भाजप सदस्य नोंदणी अभियान



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

देशभरात भाजप सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत असून कर्जत विधानसभा मतदरसंघातील खालापूर मंडळात जास्तीत जास्त सदस्य नोंदणी होण्याकरिता माजी आमदार सुरेश भाऊ लाड यांच्या मार्गदर्शना खाली आढावा बैठक साजगाव एन पी ढाबा येथे झाली.

प्रत्येक कार्यकर्त्याने किमान शंभर हून अधिक सदस्य नोंदणी करावी, असे आवाहन बैठकीत करण्यात आले. या वेळी शंभर हून अधिक सदस्य नोंदणी करणारे माजी सभापती नरेश पाटील व वाहतूक सेल तालुका अध्यक्ष हरीभाऊ जाधव यांचा जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी व माजी आमदार सुरेश लाड यांनी सन्मान केला.

या वेळी भाजप जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस दिपक बेहरे, माजी जिल्हा परिषद सभापती नरेश पाटील, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, खालापूर तालुका मंडल अध्यक्ष सनी यादव, खालापूर तालुका महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता दळवी, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष नागेश पाटील, निकिता ताई हेलांडे, हरिभाऊ जाधव, खालापूर शहर अध्यक्ष दीपक जगताप, हेमंत पाटील, रवींद्र मोरे, विकास रसाळ, भरत महाडिक, प्रसाद पाटील, सुनील सुखदरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# ऊर्जा कार्यक्षमता आणि संवर्धन विषयावर कार्यशाळा



**रसायनी : प्रतिनिधी**

राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण सप्ताह आणि राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण दिनाचे औचित्य साधून बॉम्बे डाईंग कंपनीतर्फे नुकताच ऊर्जा कार्यक्षमता आणि संवर्धन या विषयावर सेंट. जोसेफ कॉन्व्हेट स्कूल, लोधीवली येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

ऊर्जा कार्यक्षमता आणि संवर्धन या विषयाला अनुसरून कंपनीच्या ऊर्जा विभागाचे सहाय्यक महाव्यवस्थापक निलेश जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात प्रश्नमंजुषा या कार्यक्रमामध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

सुरुवातीला शाळेतर्फे बॉम्बे डाईंग कंपनीच्या ऊर्जा विभागाचे सहाय्यक महाव्यवस्थापक निलेश जाधव, पंकज दवे, असिफ अनिस, अमित नागतोडे, अमित कुमार, रमाकांत महाना, स्वामिनाथ गुप्ता यांचे स्वागत पुष्प गुच्छ देऊन करण्यात आले. तसेच बॉम्बे डाईंग कंपनीतर्फे शाळेच्या प्रिंसिपल क्लारा रॉचा आणि शैक्षणिक संस्थेच्या मॅनेजर सिल्व्हिया फर्नांडिस यांचा भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला व इतर सहकारी अध्यापकांचा सन्मान करण्यात आला. दहावी व अकरावीच्या विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदविला.

# कर्जत तालुक्याचा सर्वांगीण विकास हीच माझी प्राथमिकता -आमदार थोरवे




**कर्जत : प्रतिनिधी**

’रस्ते म्हणजे प्रगतीचा मार्ग! कर्जत तालुक्याचा सर्वांगीण विकास हीच माझी प्राथमिकता आहे. या रस्ते सुधारणा प्रकल्पामुळे दळणवळण सुलभ होईल. व्यापाराला चालना मिळेल आणि ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाला गती मिळेल तसेच शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रोजगारनिर्मिती यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये विकास शक्य आहे भविष्यातही मतदारसंघातील सर्व गावांमध्ये प्रगत सुविधा पोहोचवण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असा शब्द आमदार महेंद्र थोरवे यांनी येथे दिला.

कर्जत तालुक्यातील छोटे वेणगाव येथे रस्ते सुधारणा प्रकल्पाच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार महेंद्र थोरवे, जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, भाजप सरचिटणीस रमेश मुंढे, संभाजी जगताप, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, अरुण देशमुख आदी उपस्थित होते.

आमदार थोरवे यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. यामध्ये (एसएच ७६) उक्रुळ, चांधई, कडाव, तांबस, दहिवली, खांडपे, कोंदिवडे, चोची, मुगपे, मोहिली, आवळस, पळसदरी स्टेशन ते (एनएच – ५४८ – अ) रस्ता (एसएच – ४८५) या रस्त्याच्या सुधारणा प्रकल्पासाठी ८००.०० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

# खालापूर पोलिसांकडून पत्रकारांचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

पत्रकार दिनाचे औचित्य साधून खालापूर तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केला.

या वेळी महीला पोलीस हवालदार कीर्ती कांबळे आणि चंदा गायकवाड यांनी सर्व पत्रकार यांचे पंचारती करून औक्षण केले आणि भेट वस्तू दिली. खालापूर पोलीस ठाण्या कडून पत्रकारांना नेहमी सहकार्य केले जाईल, आपणही आम्हाला सहकार्य करावे, अशी अपेक्षा वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी व्यक्त केली.

या वेळी सपोनि संतोष औटी, जेष्ठ पत्रकार बाबू पोटे, प्रशांत गोपाळे, फिरोझ पिंजारी, विकी भालेराव यांनीही मनोगत व्यक्त केले. महीला उपनिरीक्षक सरिता मनवर उपस्थित होत्या.

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे, खालापूर तालुका अध्यक्ष राहुल जाधव यांनी वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांचा सत्कार केला. पत्रकार अर्जुन कदम यांनी सन्मान सोहळ्य बद्दल सर्व पत्रकार यांच्या वतीने आभार मानले.



# शिक्षकांनी पुणे, जेजुरी सहलीचा लुटला आनंद



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव उतेखोल केंद्रातील शिक्षकांची केंद्र प्रमुख शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि.७) काढण्यात आलेल्या एकदिवशीय पुणे,जेजुरी सहलीचा शिक्षकांनी मनमुराद आनंद लुटला.

या सहलीत केंद्रप्रमुख शंकर शिंदे, अस्मिता खडतर, पूर्वा येलवे, निलिमा गायकवाड, सुनिता पिंगळे, सुधा साळवी, नंदिनी वाले, मधुरा वेदपाठक, सुदर्शन वाघोरकर, वनिता डोळस,केशरबाई सानप, रितिका गोसावी,स्नेहल उतेकर, नेहा मोरे, पूजा उभारे, रमेश उभारे, दिनेश खडतर, गोरक्ष घोडे इत्यादी शिक्षक बंधू – भगिनी उत्साहात सहभागी झाले होते.

आपल्या रोजच्या शैक्षणिक कामात व्यस्त असणारे शिक्षक बंधू– भगिनी यांनी वर्षातून एकदा थोडासा विरंगुळा मिळावा म्हणून माणगाव उतेखोल केंद्रातील शिक्षकांनी पुणे, जेजुरी या ठिकाणी सहलीचे आयोजन केंद्र प्रमुख शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

# ’घर घर संविधान’ प्रभावीपणे राबविणार

## ◆ माणगाव तालुक्यातील शिक्षकांचा निर्धार

**माणगाव : बातमीदार**

’घर घर संविधान’ ह्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करुन विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घर घर संविधान पोहोचवण्यासाठी माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमधील मुख्याध्यापकांची कार्यशाळा गोरेगाव व माणगाव येथे दोन टप्प्यात गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या दरम्यान सुरेखा तांबट गटशिक्षणाधिकारी, माणगाव यांच्या संकल्पनेतून ’घर घर संविधान’ ह्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आखलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. या दरम्यान सुचवलेले सर्व उपक्रम स्वयंस्फूर्तीने प्रभावीपणे राबवून घर घर संविधान पोहोचवण्याचा निर्धार उपस्थित सर्व शिक्षकांनी आपला हात उंचावून केला.

कार्यशाळेत मार्गदर्शन करताना संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांनी संविधान म्हणजे नक्की काय आणि ते समजून घेण्याची आवश्यकता का आहे, याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. संविधानाच्या माध्यमातून आपण आपला देश कसा बनवणार आहोत आणि आपल्या देशातील सर्व नागरिकांना काय देणार आहोत, याविषयी सविस्तर मांडणी केली. ठरलेल्या नियोजनानुसार आज कार्यशाळेत संविधानाविषयी मिळालेली माहीती उपस्थित शिक्षक आपल्या शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना देणार असून ऐकलेली माहीती विद्यार्थी आपल्या पालकांना सांगणार आहेत. उद्यापासून संविधानाविषयी रोज परीपाठादरम्यान संविधानाचे अंतरंग उलगडणारी माहीती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. ही माहिती संकलित करून तालुक्यातील सर्व शाळांपर्यंत पोहचवण्याची जबाबदारी संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांना सोपविण्यात आली आहे.

या कार्यशाळेस विस्तार अधिकारी कुमार खामकर, धूळदेव कोळेकर, सर्व केंद्र प्रमुख, सर्व साधन व्यक्ती, व माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक व प्रसार माध्यम प्रमुख अनिल नाचपल्ले उपस्थित होते.

# लोकशाही दिनासाठी अर्जदारांना आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

लोकशाही दिनामध्ये अर्जदाराने आपल्या वैयक्तिक स्वरुपाच्या तक्रारींचे निराकरण करण्याकामी अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी दोन प्रतींत पाठविणे आवश्यक असून अर्जदार यांनी प्रथम तालुकास्तरावर तहसिलदार यांच्याकडे अर्ज करावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात ३० दिवसांत कार्यवाही न झाल्यास जिल्हास्तरावर अर्ज करता येईल, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन तर प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. तसेच जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय लोकशाही दिनाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यांनतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो.

## निवडक

### मुरूडमधून महिला बेपत्ता



**मुरूड :** तालुक्यामधील वावडुंगी ग्रामपंचायत हद्दिमधिल महालोर येथील खान यांच्या बागेतील झोड्यामधून लीला रोहिदास हंबिर (वय२६) या कोणालाही काही न सांगता घरातून निघून गेल्या आहेत. याबाबत त्यांची मुरूड पोलीस ठाण्यात मीसिंगची तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस महिलेचा शोध घेत आहेत. लीला हंबीर या अंगाने सडपातळ आहेत. गोल चेहरा आहे. हनुवटीवर गोंडवल्याचे डाग आहेत. नाक सरळ आहे. या बाबत या महीलेबाबत कोणासही काही माहिती पडल्यास तातडीने मुरूड पोलीस ठाणे येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याबाबत मुरूड पोलिसांनी मिसींग महीलेबाबत सर्व ठिकाणी कसून चौकशी सुधा केली आहे.

### विद्यार्थ्यांची पोलीस ठाण्याला भेट



**मुरूड :** तालुक्यातील मजगावच्या नज ॲकॅडमी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मंगळवारी मुरूड पोलीस ठाण्याला भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक विजयकुमार देशमुख, पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील यांच्या सह महिला पोलीस शिपाई प्रियांका आहेर व शिवणगेकर आदींनी या वेळी पोलीस ठाण्याला भेट दिलेल्या विद्यार्थ्यांना तेथील शस्त्रांची माहिती ती कशी, कुठे व कधी चालवली जातात. शिक्षक आशिष बुल्लु, अलमास हबीब कोकाटे, अक्सा बांगी, मतीन हमदुले, खलिल दरोगे आदी आदी उपस्थित होते.

### पत्रकार दिनी औषध व फळवाटप



**माणगाव :** तालुका पत्रकार संघातर्फे पत्रकार दिन मोठ्या उत्साहात व विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सालाबादप्रमाणे यावर्षीही तालुका पत्रकार संघातर्फे उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे पत्रकार दिनानिमित्त औषध व फळवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, ज्ञानदेव पवार, रामनारायण मिश्रा, मंगेश पोळेकर, संगीता बक्कम, हर्षदा काळे, ममता थोरे, भाजपच्या संयोजिका शर्मिला सत्वे, सुवर्णा जाधव, आदर्श शिक्षक शंकर शिंदे, लक्ष्मण दळवी, सलीम शेख, प्रभाकर मसुरे, मजिद हाजीते, विजयशेठ मेथा,सल्लागार सुभाष दळवी, आजेश नाडकर, स्वप्न साळुंके, आरोही सुर्वे, निलेश लिलाचंद शेट आदी उपस्थित होते.

### कृष्णा वर्तक यांना पुरस्कार




**पेण :** महाराष्ट्र पेन्शन असोसिएशनचा सेवानिवृत्त पुरस्कार पेण तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षक ह.भ.प कृष्णा वर्तक यांना देण्यात आला. बारामती येथे महाराष्ट्र पेन्शनर असोसिएशनचे अध्यक्ष एन.डी. मारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आल. या वेळी सरचिटणीस लक्ष्मण टेंबे, कार्याध्यक्ष वसंत वाबळे, अपर्णा कुलकर्णी आदी मान्यंवर उपस्थित होते. विविध संस्था व संघटना यांच्या माध्यमातून कृष्णा वर्तक यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### रातवड विद्यालयात विज्ञान प्रदर्शन



**माणगाव :** छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात शाळांतर्गत कल्पकतेतून कृतीकडे – अविष्कार २०२४–२५ विज्ञान प्रदर्शन मंगळवार दिनांक ७ जानेवारी रोजी अत्यंत उत्साहात झाले. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन पोस्को सामाजिक उत्तरदायित्व विभाग सहाय्यक आसावरी काळे, चेरीझन फाउंडेशनचे उपाध्यक्ष सुमित काळे, चेरिझन् फाउंडेशनचे मार्केटिंग हेड सल्लागार राकेश पडवळ, शाळेचे मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या हस्ते करण्यात आले. विज्ञान शिक्षक राजेंद्र भगत यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. परीक्षणप्रदिप नारायण दिवकर व काकासाहेब पवार यांनी केले.

### गरीब, गरजू विद्यार्थ्यांसाठी सहल



**पेण :** चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया, पुणे ही एक सामाजिक संस्था असून ती गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण वाढीसाठी व त्यांच्या विकासासाठी शैक्षणिक तसेच आर्थिक मदत करते. या संस्थेने बीएनवाय ह्या आयटी कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) प्रकल्पाच्या सहकायनि २५० मुलांची शैक्षणिक सहल पिंपरी चिंचवड सायन्स पार्क व बाबा साहेब पुरंदरे यांच्या शिवश्रुष्टी येथे आयोजित केली होती. संस्थेचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर देशमुख ह्यांच्या मार्गदर्शनाखाली या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्यकर्ते हेमंत अंदूरकर व ज्ञानदीप शाळेतील शिक्षकांनी सहभाग घेतला.

# पेणच्या बॉक्सर्सचा विभागीय स्पर्धेत डंका



**पेण : प्रतिनिधी**

एसीई बॉक्सिंग, न्यू बॉम्बे सिटी स्कूल घणसोली नवी मुंबईतर्फे आयोजित एकदिवसीय मुंबई विभागीय बॉक्सिंग स्पर्धा नुकतीच घणसोली येथील न्यू बॉम्बे सिटी स्कूलच्या ग्राउंडवर झाली. या स्पर्धेत पेण येथील ए वन बॉक्सिंग क्लबमधील १२ खेळाडूंनी सहभाग घेतला. यामध्ये त्यांनी पाच सुवर्ण आणि सात रौप्यपदके जिंकत उपविजेतेपद पटकाविले.

सुवर्णपदक विजेत्यामंध्ये अथर्व गौर (३० किलो वजनी गट), रियान पाटील (३२ किलो वजनी गट), पार्थ लिये (४८ किलो वजनी गट), प्रीत म्हात्रे (२२ किलो वजनी गट), श्रवण मानकवले (४२ किलो वजनी गट); तर रौप्यपदक विजेत्यामंध्ये राजनंदिनी पुजारी (३४ किलो वजनी गट), अश्वघोष भोपाले (३६ किलो वजनी गट), वरद म्हात्रे (२८ किलो वजनी गट), राजवीर ठाकूर (१८ किलो वजनी गट), शुभम म्हात्रे (३२ किलो वजनी गट), अगस्त म्हात्रे (६८ किलो गट), अलोक डी (६० किलो वजनी गटा) यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल सर्व खेळाडूंचे कौतुक होत आहे. रायगड आणि मुंबई बॉक्सिंग असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी यशस्वी खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी योग्य मार्गदर्शन आणि मदत करायचे ठरवले आहे. ए वन बॉक्सिंग क्लबचे प्रशिक्षक अनिश ठाकूर यांनीही खेळाडूंचे अभिनंदन केले असून येणाऱ्या काळात या बॉक्सर्सच्या सरावाकडे आणखी लक्ष देणार असल्याचे सांगितले.

# एका षटकात सहा चौकार! एन जगदीशनची फटकेबाजी

**वडोदरा : वृत्तसंस्था**


आयपीएलच्या मेगा लिलावात अनसोल्ड राहिलेल्या अन् सीएसकेच्या ताफ्यातून दिसलेल्या विकेट किपर बॅटरने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील धमाकेदार खेळीने सर्वांच लक्ष वेधून घेतले आहे. राजस्थानविरुद्धच्या प्री क्वार्टर फायनलमध्ये धावांचा पाठलाग करताना एन जगदीशन याने संघाला जबरदस्त सुरुवात करून दिली. त्याने एकाच षटकात सलग सहा चौकार मारले. या षटकात त्याच्या संघाला वाइड चेंडूसह अवांतर धावेच्या रूपात एक चौकार मिळाला. त्यामुळे एका षटकात तामिळनाडूच्या संघाला २९ धावा मिळाल्या.

राजस्थानच्या संघाने ४७.३ षटकात २६७ धावांपर्यंत मजल मारली होती. या धावांचा पाठलाग करताना तामिळनाडूचा एन. जगदीशन याने संघाला दमदार सुरुवात करून दिली. संघाच्या डावातील दुसऱ्या षटकात त्याने सहा चेंडूवर सहा चौकार मारले. तो अर्धशतकी (६५) खेळी करून बाद झाला. त्याने एकूण १० चौकार लगावले.

# वरुण चक्रवर्तीची शानदार गोलंदाजी

**वडोदरा : वृत्तसंस्था**

मिस्ट्री स्पिनर म्हणून प्रसिद्ध असलेला



वरुण चक्रवर्ती याने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत तामिळनाडूकडून एकट्याने अर्ध्या राजस्थान संघाला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. त्याने १० षटकात ५२ धावा देत पाच विकेट्स घेतल्या. अशा प्रकारे या फिरकी गोलंदाजाने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आपला मजबूत दावा केला आहे.

वरुण चक्रवर्ती जो आयपीएलमध्ये कोलकात्याकडून खेळतो, पण भारतीय स्थानिक क्रिकेटमध्ये तामिळनाडूकडून खेळताना त्याने विजय हजारे ट्रॉफीमध्ये दमदार कामगिरी केली. त्याची कामगिरी अशा वेळी झाली आहे, जेव्हा इंग्लंडविरुद्धच्या मालिकेव्यतिरिक्त निवड समिती चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी संघाची निवड करतील.











**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ**
पुरस्कृत
**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद**
पनवेल शाखा आणि
**चांगू काना ठाकूर महाविद्यालय, न्यू पनवेल (स्वायत्त)**
**(नॅक पुनर्मूल्यांकनात "A++" श्रेणी प्राप्त)**
यांच्या संयुक्त विद्यमाने
आयोजित

राज्यस्तरीय
अटल करंडक
एकांकिका स्पर्धा
वर्ष ११ वे
गौरव रंगभूमीचा..!

## महाअंतिम फेरी

रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा...

दिनांक : १०, ११ व १२ जानेवारी २०२५
स्थळ : आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल.

TIPL : मुख्य प्रायोजक : NEEL GROUP : सहप्रायोजक : पनवेल महानगरपालिका : स्थळ प्रायोजक : TRP मराठी : सोशल मिडीया पार्टनर : : जय महाराष्ट्र : मिडीया पार्टनर :

## उद्घाटन समारंभ महाअंतिम फेरी

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा आणि चांगू काना ठाकूर स्वायत्त महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित **अटल करंडक** राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी दि. १० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.०० वा. पार पडणार असून, स्पर्धेचा उद्घाटन समारंभास **मा. श्री. अरुणशेठ भगत** (अध्यक्ष, भाजपा पनवेल शहर) तसेच **मा. श्री. अनिल भगत** (अध्यक्ष, भाजपा पनवेल शहर व मा. नगरसेवक) **मा. सौ. राजश्री वावेकर** (अध्यक्ष, भाजपा महिला मोर्चा पनवेल शहर व मा. नगरसेविका) हे उपस्थित राहणार आहेत, तरी कृपया आपण या प्रसंगी उपस्थित राहून उदयोन्मुख कलाकारांना प्रोत्साहित करावे.

**आदरणीय उपस्थिती**

**मा. सौ. कल्पना कोठारी** – सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या
**मा. श्री. नितीन पाटील** – मा. नगरसेवक व सरचिटणीस, भाजपा उ. रायगड
**मा. श्री. राजू सोनी** – मा. सभापती
**मा. सौ. दर्शना भोईर** – मा. सभापती
**मा.सौ. चारुशीला घरत** – मा. उपमहापौर
**मा.सौ. रुचिता लोंढे** – मा. नगरसेविका
**मा. श्री. अजय बहिरा** – मा. स्थायी समिती सदस्य
**मा. श्री. तेजस कांडपिळे** – मा. सभापती
**मा.सौ. मानसी मराठे** – प्राथमिक फेरी परिक्षक
**मा. श्री. आशिर्वाद मराठे** – प्राथमिक फेरी परिक्षक

**आपले स्नेहांकित**

**मा. श्री. एस. के. पाटील** – स्पर्धा सचिव व प्राचार्य चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल
**मा. श्री. परेश ठाकूर** – मा. सभागृह नेता (प.म.पा.) स्पर्धा प्रमुख, अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा
**मा. श्री. प्रशांत ठाकूर** – आमदार व अध्यक्ष, अ. भा. म. नाट्यपरिषद पनवेल शास्वा

**टीम अटल करंडक**
चिन्मय समेळ • अभिषेक पटवर्धन • गणेश जगताप • अमोल खेर • शामनाथ पुंडे

**शुक्रवार, 10 जानेवारी 2025**

| क्र | संस्थेचे नाव | एकांकिकेचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| 1. | एम.ई.एस.आय.एम.सी.सी कॉलेज, पुणे | सखा | सकाळी ९:०० |
| २. | तोडकं मोडकं नाट्यसंथा, ठाणे | न्युरालिंक | सकाळी १०:१५ |
| ३ | रंगवेध थिएटरर्स, पनवेल | वर्तुळ | सकाळी ११:३० |
| ४ | परिवर्तन, कोल्हापूर | कलम ३७५ | दुपारी १२:४५ |
| ५ | सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज, ठाणे | कुक्कुर | दुपारी ०२:०० |
| ६ | कलांश थिएटरर्स, मुंबई | क्रॅक्स इन द मिरर | दुपारी ०३:१५ |
| ७ | डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर | पिंडग्राम | दुपारी ०४:३० |
| ८ | जिराफ थिएटरर्स, मुंबई | गुड बाय किस | संध्या ५:४५ |
| ९ | गुरु नानक खालसा कॉलेज, मुंबई | जुगाड लक्ष्मी | संध्या ७:०० |


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com